जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांच्या स्विय सहाय्यकाच्या घरी धाडसी चोरी

## १० तोळे सोने व दीड लाखाची रोकड लंपास, गावठी कट्टा घेवून आले होते चोरटे; गुन्हा दाखल

नगर – जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे स्वीय सहाय्यक उपमुख्य कार्यकारी अधिकारी समर्थ शेवाळे यांच्या वांबोरी येथील घरी गावठी कट्टा घेवून २ मोटारसायकलवर आलेल्या ६ चोरट्यांनी १९ मे च्या मध्यरात्री धाडसी चोरी केली. यावेळी चोरट्यांनी १० तोळे सोन्याचे दागिने, दीड लाखांची रोकड आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर चोरून नेला.

समर्थ शेवाळे यांचे आई–वडील हे दोघेही सेवानिवृत्त शिक्षक आहेत. ते वांबोरी येथे सुभाषनगर भागात देहेरे रस्त्यालगत राहतात. १९ मे रोजी रात्री मुलीकडे एका कार्यक्रमानिमित्त ते नगरला गेले होते. या संधीचा फायदा घेऊन रात्री बारा वाजण्याच्या दरम्यान सहा चोरट्यांनी दोन दुचाकीवर येऊन घरात प्रवेश केला. त्यावेळी एक चोरटा बाहेर दुचाकीजवळच थांबला होता व पाच जणांनी कुलुप तोडून आत मध्ये जाऊन सर्व कपाटे, भांडे उचकले. यावेळी सुमारे १० तोळे सोने व दीड लाख रुपये रोख रक्कम असा ऐवज त्यांच्या हाती लागला. याचवेळी सुभाषनगर येथे राहणारे दोन तरूण गावातून रात्री साडेबाराच्या दरम्यान घरी चालले होते. घरी जात असताना त्यांना शेवाळे यांच्या घरासमोर एकजण दिसल्याने त्यांनी विचारपूस केली असता त्या चोरट्याने आतील चोरट्यांना आवाज दिला व ते सर्वजण बाहेर आले. त्यातील एकाने गावठी कट्टा काढून तुम्ही इथून जा, नाहीतर तुम्हाला गोळ्या घालू, अशी धमकी दिली.

त्यामुळे हे दोन तरूण घाबरून तेथून निघून गेले. दरम्यान चोरट्यांनी दुचाकीवरून वांबोरीकडे धुम ठोकली. घटनेच्या ठिकाणी ज्येष्ठ नेते ॲड. सुभाष पाटील यांनी भेट देवून या घटनेचा ताबडतोब तपास लावण्यात यावा, अशी मागणी केली आहे. राहुरीचे पो. नि. संजय ठेंगे, उपनिरीक्षक समाधान फडवळ तसेच डॉग स्कॉड व फिंगरप्रिंटचे अधिकारी, वांबोरीचे पो. कॉ. आदिनाथ पालवे, वाल्मिक पारधी व निकम यांनी येऊन घटनेची सर्व माहिती घेतली. श्रीरामपूर विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. बसवराज शिवपुजे यांनीही घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.

## प्रेरणादायी अक्षरधन...




### बहुराष्ट्रीय कंपन्यांची पाऊले भारताकडे

कोरोना व सध्याच्या जागतिक टॅरीफ, गोंधळलेल्या परिस्थितीत अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या फक्त भारतावर लक्ष ठेवून आहेत. भारतात येऊ इच्छिते आहे.

भारत सरकारच्या 'डिजीटल इंडिया', 'वोकल फॉर लोकल' संकल्पनांशी प्रतिसाद देऊन ॲपलने भारतात स्थानिक भागीदारी वाढवली आहे. ॲपल कंपनी सॉफ्टवेअर विकासापासून पुणे–मुंबई–बंगलोर या टेक शहरांत रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट हब बनवण्याची तयारी करत आहे.

ॲपलचा या भारतीय स्थानिकीकरणाच्या रणनीतीचा भाग असला तरी यातून थेट प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लाखो रोजगारांची निर्मिती होईल. स्कील इंडिया, निर्यात यालाही प्रोत्साहन मिळेल.

ॲपल व भारत यांच्यातली ही भागीदारी केवळ आर्थिक नव्हे तर धोरणात्मक दृष्ट्याही महत्त्वाची आहे. २०२३ मध्ये मुंबई व दिल्लीत ॲपलने पहिल्या रिटेल स्टोअर्सचे उद्घाटन केले. आज भारतात ॲपलचा शेअर ७/८% इतकाच आहे पण प्रॉफीट शेअर ३५–४०% पर्यंत आहे. २०२६ पासून सर्व फोन भारतातच बनवण्यासाठी ॲपलला दुप्पट उत्पादन करावे लागेल. हीच आम्हा भारतीयांना मोठी संधी आहे.

भारताने सुरू केलेल्या प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेने मोबाईल व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीसाठी दरवाजे खुले केल्याने भारताला गुंतवणुकीसह रोजगार, निर्यात इ. क्षेत्रातही भरारी घेता येणार आहे.

ॲपलप्रमाणेच वेडा इलेक्ट्रॉनिक्स, मेटा मॅक्सवेल, डेल, एचपी अशा अनेक कंपन्या भारतात उत्पादने सुरू करत आहेत. अल्फाबूेचट इंक या गुगलच्या पालक कंपनीनेदेखील त्यांच्या पीक्सेल स्मार्ट फोनचं उत्पादन व्हिएतनामहून भारतात हलवण्याची तयारी सुरू केली आहे.

गुगलने डिक्सन टेक्नॉलॉजीज व फॉक्सकॉनशी चर्चा सुरू केल्या आहेत. यात बॅटरी, चार्जर, फिंगरप्रिंट सेन्सर सारख्या घटकांचं उत्पादनही भारतात होऊ शकते. तात्पर्य भारतीय अर्थव्यवस्था वाढत आहे – वाढणार आहे.

### टॉवरच्या कॉपर वायरची चोरी

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा शिवारातील सुजलान कंपनीच्या टॉवर वरील २५ हजार रुपये किमतीची कॉपर वायर कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना ६ जानेवारी ते २० मे दरम्यान वेळोवेळी घडली.

याबाबत संतोष भिका लंके (वय ४३, रा. हंगा, ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा शिवारात सुजलान कंपनीने बसवलेल्या टॉवर वरील २५ हजार रुपये किंमतीची विविध साईजची एकूण ८३५ मीटर कॉपर वायर ६ जानेवारी ते २० मे या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली. याप्रकरणी संतोष लंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगरमध्ये एकाच दिवशी २ ठिकाणी मंगल कार्यालयाबाहेर कारच्या काचा फोडून दागिने व रोख रकमेची झाली चोरी

नगर – मंगल कार्यालयाबाहेर पार्किंग केलेल्या कारच्या काचा फोडून सोन्याचे दागिने व रोकडच्या चोऱ्या झाल्याच्या घटना एकाच दिवशी १९ मे रोजी सायंकाळ ते मध्यरात्र या कालावधीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या आहेत. यातील एक घटना नगर मनमाड रोड वर असलेल्या वृंदावन लॉनच्या पार्किंग मध्ये तर दुसरी घटना नगर ते छत्रपती संभाजी नगर रोडवरील पोखर्डी शिवारात असलेल्या साई आनंद लॉन येथे घडली आहे.

सावेडी परिसरातील वृंदावन लॉनच्या पार्किंग मध्ये घडलेल्या घटनेबाबत किर्ती आनंदा खंदारे (वय ४५, काळेवाडी, रा. पिंपरी चिंचवड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी या १९ मे रोजी चुलत भावाचे लग्नानिमित्त आयोजित हळदीच्या कार्यक्रमासाठी पुणे येथुन नगर येथे आल्या. प्रेमदान हॉटेल येथून त्यांच्या भावाची महिंद्रा कंपनीची एक्सयुव्ही ३०० कार (क्र. एम.एच १६ बी झेड ७५८२) मध्ये बसुन संजोग हॉटेल शेजारी वृंदावन लॉन येथे गेल्या. लॉनच्या पार्कींगमध्ये कार लावुन फिर्यादी यांनी त्यांची बॅग व त्यामध्ये असलेली पर्स कार मध्ये ठेवुन लॉनच्या आतमध्ये हळदीचा क्रार्यक्रमासाठी गेल्या.

त्यानंतर रात्री हळदीचा कार्यक्रम संपल्यानंतर घरी जाण्यासाठी कारजवळ गेल्या असता त्यांना कारची डाव्या बाजुची मागची काच फुटलेली दिसली. तसेच गाडीमध्ये ठेवलेली बॅग दिसली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने कारची काच फोडून आतील बॅग मधील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील कर्णफुले, २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गळ्यातील पेन्डल, १० हजार रुपये रोख रक्कम, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, युनियन बँकचे डेबीट कार्ड असे कागदपत्रे चोरुन नेले.

या प्रकरणी कीर्ती खंदारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द बी एन एस कलम ३०३ (२), ३२४(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी घटना नगर ते छत्रपती संभाजी नगर रोडवरील पोखर्डी शिवारातील साई आनंद लॉनच्या पार्किंग मध्ये १९ मे रोजी सायंकाळी ५ ते मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली. या बाबत प्रफुल्ल झुंबर आव्हाड (वय २९, मूळ रा. लोहारवाडी ता. नेवासा हल्ली रा. विंग ता. खंडाळा, जि. सातारा ) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १९ मे रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या चार चाकी कार (क्र. एम.एच ३६ ए जी ३०६०) मध्ये पोखर्डी शिवारातील साई आनंद लॉन येथे गेले. लॉनच्या पार्कींगमध्ये कार लावून ते आतमध्ये लग्न समारंभासाठी गेले.

त्यानंतर रात्री उशिरा लग्न समारंभ संपल्यानंतर घरी जाण्यासाठी ते कार जवळ गेले असता त्यांना कारमधील दागिने मोबाईल ठेवलेली पर्स दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या कारमधून १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, वन प्लस कपंनीचा मोबाईल, मतदानकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, एस बी आय बँकेचे एटीएम कार्ड अशी कागदपत्रे असा ऐवज चोरुन नेला.

या प्रकरणी प्रफुल्ल आव्हाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# जुन्या वादातून तरुणावर केला कोयत्याने हल्ला; रावण व त्याच्या ३ साथीदारांवर गुन्हा दाखल

नगर – जुन्या वादातून चौघांनी तरुणास रस्त्यात अडवून शिवीगाळ, दमदाटी लाथा बुक्क्यानी मारहाण करत, त्याच्यावर धारदार कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला केल्याची घटना एमआयडीसी परिसरातील माताजी नगर येथील वेअर हाऊस कॉर्पोरेशन जवळ १९ मे रोजी सकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत जमीर शौकत पठाण (वय २३, रा. मोरया मेडिकल जवळ, मोरया पार्क, गांधीनगर, बोल्हेगाव) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी पठाण याचे आशिष शिरसाठ, चैतन्य सरोदे, प्रेम नायर उर्फ रावण, आणि विशाल आडगळ (सर्व रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्याबरोबर काही दिवसापूर्वी वाद झाले होते. त्या वादाचा मनात राग धरुन चौघांनी फिर्यादी हे मोटरसायकलने त्यांच्या घरी जात असताना वेअर हाऊस जवळ त्यांना अडवले आणि शिवीगाळ दमदाटी करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांच्याकडे धारदार कोयत्याने फिर्यादीच्या दोन्ही पायांवर, हातावर वार करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. त्यानंतर चौघे मारेकरी तेथून पसार झाले. याप्रकरणी जमीर पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी चौघांनी विरुद्ध बी एन एस कलम ११८ (२) ३५२ ३५१ (२) ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पितळे करीत आहे.

### शालनबाई पंगुडवाले यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – हातमपूरा येथील रहिवासी शालनबाई लिंबाजी पंगुडवाले (वय ७२) यांचे २० मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर लालटाकी येथील लिंगायत गवळी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. राजेंद्र, संजय (भाऊड्या) पंगुडवाले यांच्या त्या मातोश्री होत.

### अंजनाबाई पंधारे यांचे निधन



नगर – सारसनगर येथील रहिवासी अंजनाबाई पंधारे (वय ८७) यांचे २० मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दररोज अंधाराच्या साम्राज्यात राहणारे अहिल्यानगर शहर

## होणारे नुकसान, चोरीच्या घटना.. मंगळसूत्र हिसकावण्याच्या घटना ; आमदार संग्राम जगताप यांना माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांचे निवेदन





नगर – अहिल्यानगर शहरातील अकार्यक्षम वीज मंडळ कोणाच्या आशीर्वादाने शहरवासीयांना दररोज अश्मयुगात घेऊन जातंय...? आपल्याकडे आठवड्यातून शनिवारी वीज नसते याची आम्हाला सवय आहे. त्यानुसार आम्ही नगर वासीय आमची मानसिकता करीत असतो. अन् ही तयारी ठेवायलाच हवी. पण हल्ली तर दररोज केव्हाही वीज गाव होत असते. शहरात अंधाराचे साम्राज्य असते. याचा फटका नगरवासियांना रोजच बसत असतो. विशेषतः विद्यार्थ्यांना...पण ह्या शहरातील वीज मंडळ ज्या पद्धतीने शहराला अंधारात घेऊन जातंय अशी परिस्थिती इतर कोणत्याही शहराची नसेल. इतका अकार्यक्षम वीज मंडळाचा स्टाफ कोणत्याही जिल्ह्यात नसेल.

गलेलठ्ठ पगार, शासनाच्या सुविधा आणि लाचार, हतबल, सहनशील नगरकर याचा गैरफायदा येथील जबाबदार अधिकारी रोज घेत आहेत. हे भयानक आहे. आपण सगळे आधुनिक जगात आहोत. एकतर यांचे सगळे फोन बंद करून ठेवलेले. बिनधास्त स्टाफ, जणू काही आमच्या शहरावर हे लोक उपकार करीत आहेत, असे यांच्या बोलण्यातून कायमच जाणवते. यांचा गॉडफादर नक्कीच कोणीतरी असावा नाहीतर हे लोक इतक्या अकार्यक्षम पणाने वागू शकत नाही.

सावेडी भागात तर दोन तासांपासून वीज गायब आहे. ही शोकांतिका असून अन्याय आहे. का नाही या भागात चोऱ्या, मंगळसूत्र हिसकावण्याचे प्रकार राजरोस चालणार यांना कोणी जाब विचारणारा कोणीच नाही का. या संदर्भात या प्रकाराची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक जयंत येलुलकर (९८२२०९६९६१) यांनी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### परशुराम उमाप यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कोठी स्टेशन रोड भागातील रहिवासी परशुराम उमाप (वय ६२) यांचे अल्पशा आजाराने २० मे रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### पुरुषोत्तम वैकर यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – पुणे येथील रहिवासी पुरुषोत्तम एकनाथ वैकर (वय ७६) यांचे १९ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे ३ भाऊ, भावजया, २ बहिणी, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते व्हिआरडीई मधून टेक्नीकल ऑफीसर पदावरुन सेवानिवृत्त झाले होते.

# सिद्धार्थनगर भागातील कचरा उचलावा अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणार



नगर – प्रभाग क्रमांक ९ मधील सिद्धार्थनगर भागात अनेक दिवसांपासुन कचरा साचलेला आहे. सिद्धार्थनगर भाग हा मोठ्या लोकवस्तीचा आणि पालिकेचे अनेक कर्मचारी याच प्रभागात राहतात. त्यांचे व त्यांच्या मुलांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या ठिकाणी हा कचरा साचलेला आहे. त्याच्या बाजूला करंदिकर हॉस्पिटल व महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र आहे. अनेक रुग्ण या हॉस्पिटलमध्ये व आपल्या आरोग्य केंद्रात उपचार घेण्यासाठी येतात. त्या ठिकाणी कचरा साचल्यामुळे खुप मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे व अनेक लोक आजारी पडत आहे.

संबंधित विभागाला सिद्धार्थनगर भागातील कचरा त्वरित उचलण्याचे आदेश द्यावे अन्यथा सर्व नागरिकांसमवेत तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी नगरसेवक धनंजय जाधव यांनी महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.

### राजेंद्र पाचपुते यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – काष्टी येथील राजेंद्र आनंदराव पाचपुते (वय ६३) यांचे २० मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर काष्टी येथील घोडनदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, १ बहिण, २ पुतणे असा परिवार आहे. बाबासाहेब आनंदराव पाचपुते यांचे ते धाकटे बंधू होत. तर उद्योजक ओम एजन्सीचे मालक मोहनशेठ पाचपुते यांचे चुलते होत.

# मुळा धरणात बुडालेल्या अहिल्यानगरच्या तरुणाचा २ दिवसांनी सापडला मृतदेह



भगवान घाडगे

राहुरी – राहुरीच्या मुळा धरणात पोहण्यासाठी पाण्यात उतरलेला ३५ वर्षीय विवाहित तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. अहिल्यानगर एमआयडीसी येथून फिरण्यासाठी आलेल्या तरुणांना पोहण्याचा मोह आवरला नाही. त्यात ही दुर्घटना घडली. १८ मे रोजी बुडालेल्या तरुणाचा मृतदेह २० मे रोजी सकाळी आढळून आला आहे.

भगवान रुस्तुम घाडगे (वय ३५, रा. नागापूर रेणुका माता मंदिर परिसर, एमआयडीसी, मूळ रा. सोनोशी कोरडगाव, ता.पाथर्डी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. भगवान घाडगे हा आपल्या सात ते आठ मित्रांबरोबर १८ मे रोजी मुळा धरण येथे फिरण्यासाठी आला होता. मुळा धरणाचे पाणी पाहून धरणामध्ये पोहण्याचा मोह न आवरल्याने हे सर्व तरुण पाण्यामध्ये पोहण्यासाठी उतरले. यावेळी भगवान घाडगे हा पोहत असताना अचानक पाण्यात बुडू लागला. सोबत असलेल्या तरुणांनी मोठी आरडा–ओरड केली. मात्र तो पाण्यात दिसेनासा झाला.

यावेळी बरोबर आलेल्या तरुणांनी भगवान याचा शोध घेतला, मात्र तो आढळून आला नाही. स्थानिक मच्छिमारांच्या मदतीने भगवानचा २ दिवस शोध घेण्यात आला, मात्र कुठलाही ठावठिकाणा लागला नाही. २० मे रोजी सकाळी मुळा धरणाच्या बंदिस्त मच्छिपालन (केज) जवळील पाण्यावर भगवानचा मृतदेह तरंगताना आढळून आला. याबाबतची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मच्छिमारांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढुन पंचनामा केला. राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

मयत घाडगे याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे.

### श्रीमती निर्मलाबाई मुनोत यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – पाषण रोड पुणे येथील रहिवासी श्रीमती निर्मला मनसुखलाल मुनोत (वय ८१) यांचे १६ मे रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हस्तीमल व विलास मुनोत यांच्या वहिनी होत.

### नारायण तोटा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – दातरंगे मळा येथील रहिवासी नारायण बालया तोटा (वय ८०) यांचे १८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मान्सूनपूर्व काळात अहिल्यानगर शहर पाणीपुरवठा योजनेवरील विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांनी सहकार्य करावे

नगर – सद्यस्थितीत मान्सुन पूर्व परिस्थिती असून लवकरच पावसाळ्याचे दिवस सुरू होत असल्याने याबाबत आजवरचा अनुभव पाहता मान्सुन पूर्व काळात वादळी वाऱ्यामुळे शहर पाणी पुरवठा योजने करीता विद्युत वितरण कंपनीकडून होणारा वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वीज मंडळाकडून होणारा वीज पुरवठा नैसर्गिक आपत्ती व तांत्रिक अडचणीमुळे बिघाड निर्माण होवून वीज पुरवठा अर्धा–एक तास जरी खंडीत झाला तरी मुळानगर, विळद व नागापूर येथील कार्यरत पंपींग स्टेशन येथून पाणी उपसा सुरळीत होण्यास सुमारे दोन ते तीन तासाचा अवधी लागतो. त्यामुळे अनियमीत पाणी उपसा होवून शहरातील वितरणासाठीच्या टाक्या वेळेत भरता येत नाहीत. पर्यायाने शहरास नियमीत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वीज मंडळाच्या तांत्रिक अडचणीमुळे व सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने वादळी वाऱ्यासह पाऊस होत असल्याने अचानक वीज पुरवठा खंडीत होत आहे व खंडीत वीज पुरवठ्यामुळे नियमित पाणी उपसा होणेस अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांनी पाण्याचा योग्य साठा करून पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे मनपाने दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हा आहे धोक्याचा इशारा...

काहींना आंघोळ करताना वारंवार लघवी होते. जरी ही एक सामान्य गोष्ट असेल, परंतु कधीकधी हे गंभीर आजारामुळे देखील होऊ शकते. अनेक वेळा लोक आंघोळ करताना लघवी करतात. ही बद्धकोष्ठतेची समस्या, प्रोस्टेट कर्करोग, काही कारणांमुळे ओटीपोटाचा भाग खराब होणे यासारख्या काही आजारांचे लक्षण असू शकते. अशा स्थितीत ही समस्या पुन्हा पुन्हा येत असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पाककला

### डाळ ढोकळी

**डाळीसाठी साहित्य :** तूर डाळ, २ चमचे शेंगदाणे, २ हिरव्या मिरच्या, २ टोमॅटो बारीक चिरून, १/२ चमचा हळद

**ढोकळीसाठी साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ, २ चमचे बेसन पीठ, १/२ चमचा हळद, १ चमचा मिरची पावडर, १ चमचा धणे पावडर, १/४ चमचा ओवा, मीठ चवीनुसार, २ चमचे तेल, २ चमचे कोथिंबीर बारीक चिरून

**फोडणीसाठी साहित्य :** ३ चमचे तेल, १/२ चमचा प्रत्येकी जीरं आणि मोहरी, दीड चमचा ठेचलेला लसूण, १ टोमॅटो बारीक चिरून, १५ कढीपत्त्याची पाने, २ सुक्या मिरच्या, १/४ चमचा हिंग, १/४ चमचा हळद, १/२ चमचा लाल तिखट, १ लिंबाएवढा गूळ, मीठ चवीनुसार, २ चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती :** प्रथम तूर डाळ धुवून कुकरमध्ये ठेवून त्यात शेंगदाणे, टोमॅटो आणि दोन हिरव्या मिरच्या आणि गरजेप्रमाणे मीठ घालून कुकरच्या चार शिट्या काढून घ्याव्यात. त्यानंतर गव्हाचे पीठ, बेसन, बारीक चिरलेली कोथिंबीर, ओवा, हळद, लाल मिरची, धणे पूड आणि मोहनासाठी तेल घालून पीठ मळून घ्यावे. कढईमध्ये तेल घालून त्यात जीरे मोहरी तडतडून झाल्यावर ठेचलेला लसूण थोडा तांबूस करून घ्यावा नंतर कढीपत्ता आणि सुखी लाल मिरची घालावी. नंतर हिंग आणि बारीक चिरलेला टोमॅटो घालून टोमॅटो शिजेपर्यंत परतून घ्यावे. नंतर शिजवून घेतलेली तूरडाळ, धने पूड, लाल तिखट, हळद गरजेप्रमाणे मीठ घालून डाळ उकळू द्यावी. डाळ उकळेपर्यंत मळलेल्या पिठाच्या पातळ पोळ्या लाटून त्याचे चौकोनी काप करून घ्यावेत. उकळत असलेल्या डाळीमध्ये एक एक ढोकळी सोडत राहावी मधून हलवत राहावे अशा तऱ्हेने सर्व ढोकळी टाकून झाल्यानंतर गूळ टाकून मंद गॅसवर दोन-तीन मिनिटं उकळू द्यावे ढोकळी शिजून वर आल्या की गरजेप्रमाणे पातळ करून घ्यावे. बारिक केलेल्या कोथिंबीरीने सजवावे. वरून साजूक तूप टाकावे.

## वास्तू

### चांगली झोप येण्यासाठी

जर तुमच्या पलंगाच्या समोर टेलिव्हिजन वगैरे असेल तर ते काढून टाका. याशिवाय चांगल्या झोपेसाठी तुमच्या बेडरूमच्या ईशान्य कोपऱ्यात एका काचेच्या भांड्यात मोती ठेवा. तमालपत्र आणि गोमती चक्र आपल्या पलंगाच्या वर म्हणजेच डोक्याजवळ गादीखाली ठेवा. रात्री झोपताना तुमच्या बेडरुममध्ये वातावरण चांगले करण्यासाठी चांगले संगीत लावा. यामुळे चांगली झोप येण्यास मदत होते.

## सल्ला

बॉडीकॉन किंवा मॅक्सी ड्रेससोबत वेगवेगळ्या स्टाइलचे बेल्ट वापरून तुम्ही स्टाइल मिळवू शकता.

## सौंदर्य

ब्युटी प्रॉडक्ट तुमच्या त्वचेवर दुष्परिणाम करत असतील तर त्यापासून दूर राहणं हाच उत्तम उपाय आहे. त्वचेची निगा राखण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि नैसर्गिक उपाय करणे सुरू करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २२ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, पू.भा. १७।४७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** प्रवासाचे योग संभवतात. आजचा दिवस कठोर परिश्रम करण्यात जाईल.

**वृषभ :** पोरकटपणा करणे महाग जाईल. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मन अस्वस्थ होईल.

**मिथुन :** आरोग्य उत्तम राहील. मागील उधारी-उसनवारी वसुल होईल. जोडीदाराबरोबर घालवलेली वेळ सुखद राहील.

**कर्क :** आपल्या आवडीच्या नातलगांना भेटाल. मनोरंजनासाठी वायफळ होईल. उसने उधार घ्यावे लागेल.

**सिंह :** आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. परदेशागमनाचे योग येतील. तरुणांना नोकरीत सुसंधी प्राप्त होईल.

**कन्या :** मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. काही प्रश्नांची सोडवणूक सर्वांना करावी लागेल. यामध्ये कुटुंबियांचे विशेष योगदान राहिल.

**तूळ :** बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील.

**वृश्चिक :** प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. व्यापार-व्यवसायिकांना दिवस संमिश्र. मानसिक सुखशांती मिळेल.

**धनु :** आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित कराल. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल.

**मकर :** प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल. आजची संध्याकाळ मित्रांबरोबर व्यतित होईल.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी प्रसन्न वातावरण राहील. काळ अनुकूल आहे. महत्वाचे काम टाळा. विवाहेच्छुकांना स्थळे चालून येतील. विवाह जमतील.

**मीन :** हसत खेळत वेळ खर्च होईल. आरोग्य बिघडेल. कामाचा भार अधिक राहील. जुनी मित्र-मैत्रिणी भेटतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७१८२

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ७ | | ■ | |
| ८ | ९ | | ■ | १० | | ११ | |
| ■ | | ■ | १२ | | ■ | | ■ |
| १३ | | १४ | ■ | १५ | १६ | | १७ |
| | ■ | १८ | | ■ | | ■ | |
| १९ | २० | | ■ | २१ | | २२ | |
| २३ | | | | | ■ | २४ | |

**आडवे शब्द :-** १) एकमेकांची भेट व्हावी असा अंदाज असताना तो चुकणे ४) भांड्याचे तोंड बंद करण्याचे वस्त्र; गायनातील एक ताल ६) सहा तोंडांचा; कार्तिक स्वामी ८) तारणारा; वाचविणारा १०) एक सुगंधी फूल १२) फुलातील गोड रस; मकरंद १३) प्रतिपदा; वर्षप्रतिपदा १५) धन; वित्त; संपत्ती १८) दीन; गरीब १९) लागवडीस न आणलेली पडीक जमीन; जंगल; रान २१) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ २३) खात्री; भरवसा; विश्वास २४) विंचेचे एक कालवण; तात्पर्यार्थ

**उभे शब्द :-** १) वडिलांचा भाऊ; काका २) गणपतीचे वाहन; उंदीर ३) सुळका; खडपा ४) सद्वर्तन; उदारता; शील ५) गायनातील मिश्र किंवा पोटराग ७) अतिशय नीच माणूस ९) भरपूर; खूप; पुष्कळ ११) देवांचे शत्रू; दैत्य; दानव १३) पाठीशी उभा राहणारा १४) पुन्हा पुन्हा १६) वृष्टी; पाऊस; मारा १७) लक्ष्मीपती; विष्णू २०) वाकलेला; झुकलेला २१) विष्णुपत्नी; लक्ष्मी २२) धरती; धरित्री; वसुंधरा; पृथ्वी

**शब्दगंध क्र. ७१८१ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | क | ळ | ■ | पं | चा | य | त |
| ट | व | का | ■ | च | ळ | ■ | मा |
| क | ■ | की | ट | क | ■ | दि | शा |
| मं | द | ■ | प | ■ | ना | व | ■ |
| ह | र | घो | क | ■ | का | स | व |
| ■ | डा | क | ■ | स | ■ | ■ | ळ |
| मा | प | ळ | ■ | का | व | का | व |
| रा | णी | ■ | मो | ळ | ■ | का | ळ |

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** कर्ज आणि कर्म या अशा गोष्टी आहेत, ज्या चुकविल्याशिवाय माणूस नीट जगू शकत नाही आणि मरुही शकत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सॅनिटरी पॅडचा शोध कोणी लावला?

सॅनिटरी पॅड्सचं नाव ऐकताच आजही लोक नाक-तोंड वाकडं करू लागतात. कारण हा याचा संबंध महिलांच्या मासिळ पाळीशी आहे. त्यामुळे समाज सॅनिटरी पॅड्सला त्यांचांच भाग मानतात. पण महिलांसमोर सॅनिटरी पॅडचं नाव घेण्यासही लाज वाटणाऱ्या पुरूषांना हे माहीत नाही की, पहिल्यांदा हे पॅड महिलांसाठी नाही तर पुरुषांसाठी तयार करण्यात आले होते.

माय पिरिअड ब्लॉगच्या एका पोस्टनुसार, सर्वात आधी सॅनिटरी पॅटचा वापर पहिल्या महायुद्धादरम्यान केला गेला होता. फ्रान्सचा नर्सनी पहिल्या महायुद्धावेळी जखमी सैनिकांचे वाहणारे रक्त रोखण्यासाठी पहिल्यांदा हे पॅड तयार केले होते. असे सांगतात की, हे नॅपकिन बेंजमिन फ्रेंकलिन यांनी एका आविष्कारातून प्रेरित होऊन तयार केले होते. त्यावेळी हे नॅपकिन तयार करताना काळजी घेण्यात आली होती की, याने सहजपणे रक्त शोषले जावे आणि एकदा वापर केल्यावर याला सहजपणे नष्ट करता यावे. जेव्हा फ्रान्सच्या सैनिकांसाठी सॅनिटरी पॅड तयार करण्यात आले, तेव्हा फ्रान्समध्ये काम करणाऱ्या अमेरिकन नर्सनी यांचा वापर मासिक पाळीदरम्यान करणे सुरू केले. १८८८ मध्ये कॉटेक्स नावाच्या कंपनीने युद्धात प्रयोग केल्या गेलेल्या आधारावरच 'सॅनिटरी टॉवल्स फॉप लेडीज' नावाने सॅनिटरी पॅडचे निर्माण सुरू केले. १८८६ मध्ये याआधी जॉनसन ॲन्ड जॉनसनने लिस्टर्स टॉवल्स नावाने डिस्पोजबल नॅपकिन्स तयार करण्यास सुरूवात केली. हे नॅपकिन्स रूईप्रमाणे दुसऱ्या फायबरला अब्जॉर्बेट लायनरने कव्हर करून तयार केले जात होते. पण हे त्यावेळी इतके महाग होते की, महिला त्या खरेदी करू शकत नव्हत्या. त्यामुळे त्यावेळी केवळ श्रीमंत घरातील महिलाच सॅनिटरी नॅपकिनचा वापर करत होत्या.

काळानुसार सॅनिटरी नॅपकिनच्या रूपात बराच बदल झाला. हळूहळू हे सामान्य महिलांसाठीही उपलब्ध होऊ लागले. पण आजही आपल्या देशात अनेक महिलांकडे सॅनिटरी पॅड खरेदी करण्यासाठी पैसे नसतात. आणि त्यामुळे त्या त्यांच्या सुरक्षेसाठी व आरोग्यासाठी याचा वापर करू शकत नाहीत.

आजही सॅनिटरी नॅपकिनकडे किंवा मासिक पाळीकडे आपला समाज चांगल्या नजरेने बघत नाही. आजही यावर मोकळेपणाने चर्चा होत नाही. लोक आजही मासिक पाळी शब्द उच्चारला तरी अवघडतात. इतकंच काय तर आपल्याच शारीरिक प्रक्रियेबाबत महिला बिनधास्तपणे बोलू शकत नाहीत. हिच एक शोकांतिका आहे.

### बौद्धावतार

ही कथा वैशंपायन ऋषींनी जनमेजयाला सांगितली. एकदा सर्व राक्षस गुरु शुक्राचार्यांकडे गेले. पृथ्वीचे व स्वर्गाचे राज्य जिंकण्यासाठी काय करावे, असे ते विचारू लागले. तेव्हा राक्षसांचे वास्तव्य पाताळात होते. गुरू शुक्राचार्यांनी सांगितले, की एक लक्ष यज्ञ केले असता देवेंद्राच्या राज्याची प्राप्ती होते. त्यानुसार राक्षसांनी ऋषींना बोलावून यज्ञ आरंभ करण्यास सांगितले. त्यासाठी लागणारे प्राणी, सामग्री आणून घेतली. यज्ञाला प्रारंभ झाला. ही वार्ता नारदाने देवेंद्राला सांगितली. आता आपले राज्य जाणार या भीतीने देवेंद्र सर्व देवांना घेऊन श्रीहरीकडे गेले व मदतीची याचना करू लागले.

तेव्हा भगवंत म्हणाले, देवहो, यज्ञांमुळे राक्षसांचा पुण्यसंग्रह वाढला आहे. तेव्हा युद्धात त्यांना हरवणे अवघड आहे. काही तरी युक्तीने मार्ग काढला पाहिजे. त्यानंतर भगवंताने नेहमीच्या वस्त्रांचा त्याग करून मोरपिसे अंगाभोवती लपेटली, पायात पुष्पपादुका घातल्या हातात मोरपिसांचा कुंचा घेऊन भूमी अलगद झाडीत, जपून पावले टाकीत ते चालू लागले. सर्व देवांनाही त्यांनी तसेच करावयास सांगितले. हे सर्व जण पाताळात तरंगजेच्या काठी जेथे यज्ञमंडप घातला होता तेथे जाऊन पोचले. राक्षसांनी त्यांचे स्वागत करून बसायला दर्भासन दिले. पण दर्भासनावर न बसता श्रीहरीने भूमी हलकेच मोरपिसांच्या कुंच्याने साफ केली व ते अलगद बसले.

राक्षसांनी याचे कारण विचारताच भगवंत म्हणाले, अहिंसा सर्वश्रेष्ठ आहे. भूमीवर अनेक सूक्ष्म जीव असतात. त्यांना इजा होऊ नये म्हणून आम्ही पुष्पपादुका घातल्या. अवकाशात अदृष्य असे जीव असतात. आपल्या शरीरस्पर्शाने त्यांना काही होऊ नये म्हणून आम्ही मोरपिसांचे वस्त्र परिधान केले. हिंसेच्या नुसत्या उच्चारानेही नरकप्राप्ती होते. तुम्ही तर यज्ञासाठी प्रत्यक्ष हिंसा करीत आहात. तेव्हा हे थांबले पाहिजे.

यावर राक्षसांनी आपणास गुरू शुक्राचार्यांनी एक लक्ष यज्ञ केल्यावर स्वर्गाचे राज्य मिळेल असे सांगितल्याचे सांगितले.

हे ऐकून भगवंत म्हणाले, तुम्ही शुक्राचार्यांवर भलताच विश्वास ठेवून तुमचा कुळधर्म, कुळाचार सोडता आहात. तुम्ही महापराक्रमी राक्षस आहात. युद्ध करून राज्य जिंकणे हे तुम्हाला अवघड नाही. हे बोलणे राक्षसांना पटले व त्यांनी यज्ञ थांबविला. अशा प्रकारे फक्त युक्तीचे बोलून, बुद्धिसामर्थ्याने भगवंतांनी देवांवरचे संकट निवारण केले. म्हणून या अवतारास बौद्धावतार असे म्हणतात.

## जीवन का अमृत (भाग १)



१. आपको सत्संग का संचालन करने का और इच्छुक भाई-बहनों को नामदान की हिदायतें देने का कार्य सौंपा गया है और सतुरु के पवित्र मिशन में आपकी इस निष्काम सेवा की मैं कद्र करता हूँ ।

दिव्य कार्य में भागीदार बनना एक अनूठा आशीर्वाद है। स्वार्थ और अहम् का त्याग करने से, उसकी दया और प्रेम बहुतायत में मिलते हैं । सतुरु के प्रति आदर, नम्रता और समर्पण भाव के होने से आपको आंतरिक शांति मिलेगी। कृपया मेरा प्यार आप अपने समूह (group) के हर एक व्यक्ति तक पहुँचायें और उनको प्रोत्साहित करें कि वे नियमित रूप से मुझे पत्र लिखकर अपनी रूहानी तरक्की के

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

बारे में बताते रहें, ताकि, जब भी जरूरत हो, उनका मार्गदर्शन किया जा सके।

२. सदाचारी जीवन में निहित नैतिक मूल्यों का पालन अवश्य होना चाहिए। प्रभु के रास्ते पर तरक्की के लिए पवित्र और सदाचारी जीवन जरूरी है ।

इन मूलभूत सिद्धांतों में कोई ढील नहीं दी जा सकती है। जो कोई भी इनका पालन नहीं करेगा, उसको इनका फल भुगतना होगा ! ये शब्द सुनने में कठोर लग सकते हैं, पर पिता नहीं चाहता कि उसके बच्चे भटक जायें ।

बच्चों के लिए उसका प्यार असीम है और उनका कल्याण ही उसके लिए सर्वोपरि है।

३. मुझे खुशी है कि आप सत्संग की बैठकों की महत्ता को अच्छी तरह समझते हैं, जो कि हमेशा प्रेरणा देने वाली, फायदेमंद और सहायक होती हैं, क्योंकि उनमें सतुरु की दया और प्रेम भरपूर मिलते हैं और जो कोई भी इन बैठकों में आता है, वह काम कर रही गुरु-शक्ति से जिन्दगी का उभार पाता है। सामूहिक बैठकों (group meetings) में, पूरी की पूरी सभा सतुरु की उमड़ती दया को अनुभव करती है और कभी-कभी श्रोतागण सतुरु के नूरी स्वरूप के दर्शन करते हैं। ऐसी बैठकें बहुत ही प्रेरणा देने वाली होती हैं और इसलिए प्रेम और भक्ति भाव से इनका लाभ उठाना चाहिए ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जो लोग बीमार रहते हैं अगर वह दिन में एक बार भोजन करें और बाकी सारा दिन जब भी भूख लगे थोड़ा सा लगभग १०० ग्राम, गाय का दूध या दही ले लिया करें या हरी पतेदार सब्जियों की सिर्फ तरी लिया करें तो उसका कैसा भी रोग हो वह ठीक हो जायेगा। शुगर भी ठीक हो जायेगी। हां जो इंसुलिन के टीके लगाते हैं वह अपनी शुगर के हिसाब से खाना लेते रहें। वह हरी सब्जियों की तरी ज्यादा प्रयोग करें तथा गाय का दूध लें। इसके पीछे विज्ञान यह है कि गाय दुःख में भी सकारात्मक तरंगे मन से देती है। यही तरंगे उसके दूध में होती हैं। गाय का दूध कोशिकाओं का पुनर्निर्माण करता है। हरे पते वाली सब्जियों में आकाश अर्थात जल, वायु और सूर्य का प्रकाश अधिक होता है जो शरीर के लिये बहुत फायदेमंद है। अपने डॉक्टर की राय जरूर लें। आकाश तत्व के असंतुलन से मिरगी, उन्माद,

### विशुद्ध ऊर्जा चक्र

पागलपन, सनक, अनिंद्रा, शक्की दिमाग, घबराहट, बुरे सपने, गूंगापन, बहरापन, विस्मृति आदि की शिकायतें पैदा होती हैं। ऐसा कोई भी लक्षण आये तो उन लोगों को भगवान को नीले आकाश में बिंदू रुप को याद करना चाहिये या अपने इष्ट को नीले आकाश पर देखा करें और उसके गुण गायें। जो लोग भगवान को नहीं मानते वह लोग सिर्फ बाहर बैठ कर दिन में ४-५ बार कम से कम १०-१० मिनट, नीले आकाश को आंखो से देखा करें और कहें आप की दया से हम यहां है, आप की दया से हम सांस ले रहे हैं। आप की दया से हमें धूप मिल रही है हवा मिल रही है। इस तरह आकाश तत्व की कमी पूरी हो जायेगी और आप खुशहाल हो जायेगें। सिर्फ नीला आकाश देखना है। राजयोगी भी ऐसा कर सकते हैं। विशेष रुप से तब जब योग न लग रहा हो तो आंखे ऊपर कर नीले आकाश को देखें।

आकाश -४

आकाश एक सूक्ष्म पदार्थ है जो हर पीले एवम ठोस पदार्थ में कुछ मात्रा में व्याप्त है। इस तत्व को ईथर कहते हैं। रेडियो पर जो दूर दूर से ध्वनियां आती हैं वे इस ईथर द्वारा ही आती हैं। जितने शब्द हैं वह हम आकाश (ईथर) के कारण सुनते हैं। अगर आकाश न हो तो हम एक दूसरें की बात नहीं सुन सकेंगे। सिर्फ मुंह हिलते हुये दिखाई देगें। हमारे बोल विद्युत तरंगों में बदल कर विश्व के किसी भी कोने में पहुंच सकते हैं। हमारे विचार विद्युत तरंगों की भांति आकाश में फैल जाते हैं और कभी नष्ट नहीं होते। थोड़ी थोड़ी भाप उड़कर बादल बन जाती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

''लग्नात जरी घातली शेरवानी...
तरी लग्नानंतर राहावं लागतं उदरावानी''
अखिल भारतीय हिला विचारुन सांगतो संघटना

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ सायप्रसपर्यंत प्रथम कोण पोहोचले?

– ग्रीस

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

मूल आजारी पडले, की संपूर्ण कुटुंबाची त्रेधातिरपीट उडते. त्यात आईच्या मनाची अवस्था तर फार बिकट होते. जोपर्यंत बाळाला बरे वाटत नाही, तोपर्यंत तिच्या मनाची घालमेल होत असते. बाळासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या आईच्या घशाखाली नीट घासही उतरत नाही. जेव्हा बाळाची तब्येत बरी होते, त्याचवेळी ती जेवणाकडे लक्ष द्यायला लागते. तोपर्यंत तिला भुकेची जाणीवही होत नाही. मनी फक्त ध्यास बाळाच्या सुखरूपतेचाच असतो.

आयुर्वेदामध्ये सुद्धा बाळाच्या आरोग्याचा विचार करताना आईचाही विचार केलेला आहे. आईचे आरोग्य चांगले असेल, तरच बाळाचेही आरोग्य सुदृढ असते. म्हणून आयुर्वेदाच्या महत्त्वाच्या आठ प्रमुख शाखांमध्ये कौमारभृत्यतंत्र या आई व बाळाच्या आरोग्याशी

### बालकांचे आजार

संबंधित स्वतंत्र शाखेचा उल्लेख केलेला आहे. आयुर्वेदाच्या ज्या शाखेत बालकाचे भरण, पोषण, आईचे स्तनदोष व त्यांची चिकित्सा सांगितलेली आहे, त्या शाखेस कौमारभृत्यतंत्र असे म्हणतात.

बालकांना दिली जाणारी चिकित्सा व औषधे ही रुचिकर असावीत. त्यांची औषधी मात्रा ही वयस्कर व्यक्तीपेक्षा भिन्न असावी. म्हणूनच सुरुवातीपासूनच मुलांची वेगळी शाखा चिकित्सेच्या दृष्टीने आयुर्वेदात सांगितली आहे. त्यामुळेच कश्यम ऋषींनी तंत्र हे आयुर्वेदाचे पहिले अंग आहे असे म्हटले आहे.

आज आपण या प्रकरणात बालकांचे आजार, लक्षणे त्यावरील उपाय यांचा विचार करणार आहोत. प्राथमिक अवस्थेतच यातील चिकित्सेचा उपयोग करावा. आजाराची अवस्था जास्त असेल, तर वेळीच तज्ज्ञ वैद्यांचा अथवा बालरोग चिकित्सकांचा सल्ला व उपचार घ्यावेत.

१. अतिसार (जुलाब):

बालकाला पातळ अशा स्वरूपात अधिक मात्रेत व पुन्हा पुन्हा मलप्रवृत्ती होते, यालाच अतिसार असे म्हणतात. को प्रवाहिका- हा अतिसाराचाच प्रकार आहे. यामध्ये थोड्या थोड्या प्रमाणात मुरड येऊन मलप्रवृत्ती होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज रहा : जिल्हाधिकारी पंकज आशिया

नगर – मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे. संभाव्य आपत्तीच्या काळात सर्व विभागाचे अधिकारी समन्वयाने कार्य करत, कोणीही पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.


मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया. समवेत अधिकारी वर्ग.

जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील हे प्रत्यक्ष उपस्थित होते; तर शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व संबंधित यंत्रणांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.


जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सर्वोतोपरी सज्ज राहावे. पूरपरिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी सुरक्षित निवाऱ्यांची पाहणी करून त्याचे सूक्ष्म नियोजन करावे. त्या ठिकाणी अन्नधान्य, पाणी, औषधी आदींची पुरेशी व्यवस्था असावी. जिल्ह्यातील विविध पाणी साठवण प्रकल्प, साठवण तलाव, पाझर तलाव यांची पाहणी करून ते सुस्थितीत असल्याची खात्री करावी. आपत्तीच्या काळात विद्युत पुरवठा व दूरध्वनी सेवा अखंडित सुरू राहील, यासाठी संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. पूरप्रवण व तलाव क्षेत्रामध्ये गाव–शोध व बचाव पथकांची व्यवस्था चोख ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या पुलांचे सर्वेक्षण करावे. धोकादायक पुलांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती कारवाई करावी. दरड कोसळणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून तेथे चेतावणी फलक लावावेत. झाडे रस्त्यावर उन्मळून पडून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. पुरामुळे पाणीपुरवठा योजना बाधित होणार नाहीत, याची दक्षता घेण्याबरोबरच पूरपरिस्थितीत सातत्याने पाण्याचे नमुने तपासावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

मान्सून कालावधीत पसरणाऱ्या साथीच्या रोगांपासून बचाव करण्यासाठी तसेच रोगराई पसरल्यास निदानासाठी उपाययोजना आखून ठेवाव्यात. प्रत्येक शासकीय रुग्णालयात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असावा. शोध व बचाव साहित्यांची तपासणी करून काही बिघाड असल्यास ते तातडीने दुरुस्त करावे. जिल्ह्यातील धोकादायक शाळा खोल्या व अंगणवाड्यांचा वापर होऊ नये. आपत्तीच्या काळात २४७ नियंत्रण कक्ष सुरू राहील, याची दक्षता घ्यावी. महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करावी. शहरांमध्ये ड्रेनेज अडथळ्यांमुळे अनेक वेळा पाण्याचा निचरा होत नाही, त्यामुळे ड्रेनेजची तातडीने दुरुस्ती करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# अहमदनगर शहराच्या स्थापना दिनानिमित्त २४ ते ३१ मेपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन

नगर – जगात फार कमी शहरे अशी आहे ज्यांचा स्थापना दिवस माहिती आहे, त्यापैकी एक अहमदनगर शहर. संस्थापक अहमद निजाम शहा यांनी २८ मे १४९० रोजी वसविले. येणाऱ्या २८ मे रोजी अहमदनगर शहराचा ५३५ वा स्थापना दिवस आहे. त्यानिमित्त मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाच्या वतीने २४ ते ३१ मे पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान यांनी सांगितले.




या सप्ताहामध्ये २४ मे रोजी रात्री ९ वाजता महफिले मुशायरा, २५ व २६ मे रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ऐतिहासिक जुन्या नोटा, स्टॅम्प, पोस्ट पाकीट तसेच शिवरायांचे गडकिल्ल्यांचे फोटो प्रदर्शनाचे आयोजन सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात करण्यात आले आहे.

२७ मे रोजी अल करम हॉस्पिटल, किंग्सगेटरोड, रामचंद्र खुंट येथे सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत डोळे तपासणी, सर्व रोगनिदान, तपासणी व उपचार आदी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८ मे रोजी सकाळी ९ वाजता बागरोज हडको येथे अहमदनगर शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या कबरीवर चादर अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. २९ व ३० मे रोजी अहमदनगर शहरातील निजामशाही काळातील, शिवकालीन व ब्रिटिशकालीन इमारतींचे फोटो स्पर्धा असेल. ३१ मे रोजी गीत, गझल, कव्वालीच्या कार्यक्रमाने सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात संध्याकाळी ७ वाजता सप्ताहाचा समारोप होईल, असे रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर यांनी सांगितले.

या सर्व कार्यक्रमात इतिहासप्रेमी व रसिकांनी सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे अभिजीत वाघ व भैरवनाथ वाकळे यांनी केले आहे.

# सकल माळी समाजाच्या वधू-वर सूचक मंडळाच्या अध्यक्षपदी भास्करराव चौधरी

## उपाध्यक्षपदी राजाराम चिपाडे, सचिवपदी सुदाम बोरुडे, खजिनदारपदी रमेश चिपाडे

नगर – सकल माळी समाज ट्रस्ट संचालित वधू–वर सूचक मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. यात सर्वानुमते कार्यकारीणीची निवड करण्यात आली. वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष–भास्करराव चौधरी, उपाध्यक्ष–राजाराम चिपाडे, सचीव–सुदाम बोरुडे, खजीनदार– रमेश चिपाडे तर विश्वस्तपदी संजय ताजणे, दत्तात्रय शिंदे, अशोक हिंगे, सुभाष गोंधळे, मच्छींद्र बनकर, सौ. रोहिणी बनकर आदींची निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, मार्गदर्शक बाळासाहेब बोराटे, विश्वस्त प्रा.माणिक विधाते, विनोद पुंड, कोअर कमिटी सदस्य संजय गारुडकर, अनिल इवळे, अमोल भांबरकर, सुरेश आंबेकर, चंद्रकांत पुंड, रोहित पठारे, सुधाकर कानडे आदी उपस्थित होते.



किशोर डागवाले म्हणाले, सकल माळी समाजाचे वधू वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे. वधू वर सूचक मंडळाचे सर्व विश्वस्त अत्यंत तळमळीने, निस्वार्थपणे, समाज हिताच्या दृष्टीने समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्याने कार्य करीत आहेत.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वधू वर सूचक मंडळाच्या नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. वधू वर सूचक मंडळाचे माजी अध्यक्ष अशोक हिंगे यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे.

दर रविवारी वधू–वर नोंदणी कार्यालय पेमराज गुगळे हायस्कूल या ठिकाणी सुरू असते.

भास्करराव चौधरी म्हणाले, लग्न जमवणे ही समाजासाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे. पुढील काळात माळी समाजासाठी वधू वर मेळावा घेण्याचा मानस आहे. सूत्रसंचालन संजय ताजणे यांनी केले. सुदाम बोरुडे यांनी आभार मानले.

# लंडनच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वप्नील खामकर यांचे संशोधन प्रबंध सादर

## ऐतिहासिक ग्रेज इन येथे भारताचे केले प्रतिनिधित्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा केला जागर

नगर – लंडन येथील ऐतिहासिक ग्रेज इन येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वप्नील खामकर यांनी संशोधन प्रबंध सादर करत भारताचे विशेषतः महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जागतिक दृष्टी: न्याय, समता आणि लोकशाही यांचे पुनर्विचार या विषयावर आधारित या परिषदेत त्यांनी आंबेडकर विचारधारेचा जागतिक परिषदेत अभ्यासपूर्वक मागोवा घेतला. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, मुंबई विद्यापीठ आणि ग्रेज इन, यूके यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. डॉ. आंबेडकर यांच्या लंडनमधील शिक्षण प्रवासाचे स्मरण करत, त्यांच्या विचारांचा जागतिक प्रभाव अधोरेखित करण्याच्या दृष्टिकोनातून ही परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.


लंडन येथील ऐतिहासिक ग्रेज इन येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वप्नील खामकर यांनी संशोधन प्रबंध सादर करत भारताचे विशेषतः महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय राज्य मंत्री, माहिती आणि प्रसारण व संसदीय कार्य मंत्रालयाचे डॉ.एल. मुरुगन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागचे (महाराष्ट्र शासन) संजय शिरसाट, मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागचे हर्षदीप कांबळे (आयएस), माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, अण्णा भाऊ साठे अभ्यास केंद्र, मुंबई विद्यापीठचे संचालक प्रा. डॉ. बळीराम गायकवाड आदी उपस्थित होते. भारतासह अनेक देशांतील शास्त्रज्ञ, धोरणतज्ज्ञ, कायदेपंडित, अभ्यासक आणि संशोधक यांचा परिषदेतील सहभाग लक्षणीय ठरला.

स्वप्नील खामकर यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधात डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक न्याय, कायदा आणि समता या विषयांवरील विचारांचा आजच्या जागतिक संदर्भात उपयोग कसा होऊ शकतो, यावर स्पष्ट आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली. आंबेडकर विचारधारेचा आधुनिक विकास, युवापिढीवरचा प्रभाव आणि समाजपरिवर्तनासाठीची उपयुक्तता यांचा त्यांनी अभ्यासपूर्ण आढावा घेतला. स्वत:चा अनुभव सांगताना स्वप्नील खामकर म्हणाले, डॉ. आंबेडकर यांचे विचार जागतिक मंचावर मांडणे ही माझ्यासाठी केवळ वैयक्तिक अभिमानाची बाब नाही, तर ती एक सामाजिक जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांतूनच नव्या पिढीला नवसंजीवनी मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

या परिषदेतील विविध सत्रांमध्ये डॉ. आंबेडकर यांचे लंडनमधील शिक्षण, ग्रेज इन मधील कायद्याचा अभ्यास, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील अर्थशास्त्राचे विचार, आणि रुपयाचा प्रश्न या त्यांच्या प्रबंधाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर झालेला प्रभाव यावर चर्चा झाली. परिषदेत सहभागी प्रतिनिधींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाऊस, लंडन येथे भेट देण्याची संधी मिळाली.

# पर्यावरणदिनी पर्यावरण परिषदेचे आयोजन

## आत्मनिर्धार फाउंडेशनचा पुढाकार

नगर – सातत्याने होणारी तापमान वाढ, प्रदूषण, वातावरणातील बदलामुळे पर्जन्यमान चक्र विस्कळीत झाल्याने निर्माण होणारी अस्मानी संकटे यासह येत्या काळात मानव समुदायावर ओढवणाऱ्या पर्यावरणीय समस्यांवर चर्चा आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी तालुक्यातील पर्यावरणप्रेमी मंडळींनी पुढाकार घेत पर्यावरण परिषदेचे आयोजन केले आहे.


शरद कराळे यांनी उपस्थितांना वटवृक्ष विकास संगोपन प्रकल्पाची माहिती दिली. (छायाचित्र – संदीप बांगर)

५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. हेच औचित्य साधून आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या माध्यमातून इसळक येथील लिंगतीर्थ येथे पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली.

शेंडी– पिंपळगाव माळवी परिसरातील टेंभी डोंगरावर पर्यावरणप्रेमी मंडळींनी १८ मे रोजी सकाळी मॉर्निंग वॉक केला. यावेळी शरद कराळे व सुदाम लांडगे यांनी टेंभी डोंगरावरील वटवृक्ष संवर्धन चळवळीची उपस्थितांना माहिती दिली. दरम्यान, सर्व सदस्यांनी पहिल्या पर्यावरण परिषदेची नियोजनपूर्व बैठक घेतली. कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. बैठकीसाठी सुनील जाजगे, रामदास कोतकर, पत्रकार संदीप बांगर, ज्ञानेश्वर डहाळे, भास्कर कोतकर, सुदाम घोडके, भाऊसाहेब म्हस्के, बबन घोडके, दुर्गवेडे भ्रमंती ट्रेकिंग ग्रुपचे अंकुश लोंढे, मच्छिंद्र म्हस्के यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. या उपक्रमात अधिकाधिक पर्यावरण आणि निसर्गप्रेमी मंडळींनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे समन्वयक ॲड. राहुल ठाणगे यांनी केले.

### धोरणात्मक निर्णय आणि कृती कार्यक्रमासाठी परिषदेचे आयोजन : महादेव गवळी

वाढत्या पर्यावरणीय समस्या लक्षात घेता वृक्ष लागवड आणि संवर्धन चळवळ आवश्यक असून त्यासाठी पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. यातील चर्चेतून काही धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार कृती कार्यक्रम हाती घेतले जातील, अशी माहिती आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली.

# युवकांच्या तत्परतेने वाचले बगळ्याचे प्राण

नगर – अहिल्यानगर येथील अमरधाम परिसरात ३ तरुणांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे आणि धाडसामुळे एका बगळा पक्ष्याचा जीव वाचला. अंत्यविधीसाठी आलेल्या बंटी दडगे यांच्या लक्षात आले की, एक बगळा पक्षी चायना मांजामध्ये अडकून झाडाच्या फांदीला लटकत होता. त्या पक्ष्याची हालचालही बंद झाली होती आणि तो जीवघेण्या अवस्थेत होता.


अमरधाम परिसरात ३ तरुणांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे बगळा पक्षाचे प्राण वाचविता आले.

चायना मांजा हा नायलॉनपासून बनवलेला असून, अत्यंत मजबूत आणि टिकाऊ असतो. त्यामुळे एकदा त्यात अडकलेल्या पक्ष्याला सहजासहजी सुटका मिळत नाही. बंटी दडगे यांनी त्वरित योगेश न्यालपेल्ली आणि शुभम सुंकी यांना माहिती दिली आणि तिघांनी मिळून त्या पक्ष्याला वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

सुरुवातीस झाडावर चढण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र फांद्या नाजूक असल्यामुळे त्या तुटत होत्या. अखेर अमरधाममध्ये असलेल्या एका मोठ्या शिडीचा वापर करून ते झाडाजवळ पोहोचले. मोठ्या बांबूच्या सहाय्याने चायना मांज्याला हळूवारपणे खेचत त्यांनी बगळ्याला हातात घेतले आणि अत्यंत काळजीपूर्वक त्या गुंतवळीतून त्याची सुटका केली.

नुसती सुटका करून थांबले नाहीत, तर त्या पक्ष्याला पाणी आणि थोडेसे अन्न देऊन त्याचे हाल झालेले शरीर सावरण्यास मदत केली. त्यानंतर त्याला परत नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. त्यांच्या या संवेदनशील आणि सामाजिक भान असलेल्या कृत्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

या घटनेमुळे चायना मांजाच्या वापरावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अनेक पक्ष्यांचे जीव घेतलेला हा धोकादायक मांजा त्वरित बंद करण्याची मागणीही नागरिक करत आहेत.

# अमेरिकेला मागे टाकत मिळवला पुरस्कार

## डॉ.आशिष गांधी यांचा मराठवाड्यातील पहिलाच प्रयत्न; चिमुकल्याला 'अकलाजिया कार्डिया' शस्त्रक्रिया यशस्वी

छत्रपती संभाजीनगर – पाश्चिमात्य देशांत होणाऱ्या संशोधनांचा आधार घेऊन आपल्याकडे अनुकरण केले जाते अशी ओरड नेहमीच होते. पण १० लाखांत एकाला होणारा 'अकलाजिया कार्डिया' हा आजार झालेल्या अवघ्या २ वर्षांच्या मुलावर नावीन्यपूर्ण शस्त्रक्रिया डॉ. आशिष गांधी यांनी यशस्वी केली. एवढेच नाही तर अमेरिकेन सोसायटी ऑफ गॅस्ट्रोइंट्रोलॉजिस्ट या परिषदेत १५०० प्रतिस्पर्धीवर मात करत जगभरात दुसरा क्रमांक शहरातील डॉक्टरांनी मिळवला. ज्येष्ठ पोटविकारतज्ज्ञ डॉ. उन्मेष टाकळकर यांच्या मार्गदर्शनात ही संपूर्ण प्रक्रिया झाली.


चिमुकल्याला 'अकलाजिया कार्डिया' शस्त्रक्रिया यशस्वी करणारे डॉ. आशिष गांधी. समवेत चिमुकल्याचे आई–वडील.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील २ वर्षांच्या सोहमला अन्नपचन होत नव्हते. द्रव स्वरूपातील अन्नदेखील नाकातोंडातून उलटी होऊन बाहेर पडत होते. चार महिने गावाकडेच उपचार केल्यावर संभाजीनगरात डॉ. मंदार देशपांडे यांच्याकडे दाखवण्यात आले. डॉ. देशपांडे यांनी आजार अचूक ओळखला. डॉ. आशिष यांच्याकडे रुग्णाला पाठवले. रुग्णावर छाती अथवा पोटावर चिरा घेऊन उघड्या शस्त्रक्रियेद्वारे उपचार केला जातो. मात्र ब्रोन्कोस्कोपच्या सहाय्याने तोंडावाटे अन्ननलिकेत प्रवेश करुन ही 'पीओईएम' प्रक्रिया पार पाडली. यामध्ये भूलतज्ज्ञ डॉ. प्रमोद अपसिंगेकर, एंडोस्कोपी तंत्रज्ञ बाबासाहेब टकले यांची भूमिका महत्त्वाची ठरली.


सौ. रंजना अमोल धामणे यांना 'राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

# 'राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार' नगरच्या सौ. रंजना धामणे (चोभे) यांना प्रदान

नगर – पिंपरी वाघेरे (पुणे) येथील रयत शिक्षण संस्थेच्या कन्या विद्यालयाच्या उपशिक्षिका तसेच केडगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री अंबिका विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. रंजना अमोल धामणे (चोभे) यांना 'राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार हा शिक्षक फाउंडेशन संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे कोल्हापूर येथे मराठी सिनेअभिनेत्री मधुराणी प्रभुलकर व कवी रोहित शिंगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे, सचिव सतीश कोळी, महाराष्ट्र शिक्षक पॅनल पुणे जिल्हा समन्वयक संध्या वाळुंज उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात सांगलीच्या टीमचा 'सुश्राव्य' गायनाच्या कार्यक्रमाने झाली त्यानंतर दुपारच्या सत्रात पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा पुरस्कार कुटूंबासह प्रदानचा सोहळा झाला.

# महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी प्रकाश गायकवाड

नगर – महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी प्रकाश लहू गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ते मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून सुद्धा अहिल्यानगर येथे काम पाहत आहेत. आता त्यांची राज्य कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली त्याबाबतचे नियुक्ती पत्र कामगार सेनेचे राज्य अध्यक्ष डॉ. मनोज चव्हाण यांनी दिले.



यावेळी बोलताना डॉ. मनोज चव्हाण म्हणाले कि आज कामगारांना खंबीर नेतृत्वाची गरज असुन, त्यांची विश्वासार्हता जपणे सर्वात महत्त्वाची बाब आहे. आपण सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेने राज ठाकरेंना अभिप्रेत असणारी कामगार संघटना उभारली पाहीजे.

महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या पुढील कार्यात कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव लढण्याची तत्परता दाखवून सक्रीय रहावे ही अपेक्षा व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# नगर अर्बन बँकेच्या ३ कर्जदारांच्या अटकेस न्यायालयाची परवानगी

नगर – नगर अर्बन बँकेच्या कर्जप्रकरणात अडकलेल्या तीन कर्जदारांच्या अटकेस सत्र न्यायालयाने पोलिसांना परवानगी दिली आहे. कर्जदार सचिन दिलीप गायकवाड, शीतल शिवदास गायकवाड आणि आशुतोष सतीश लांडगे यांना अटक करण्यासाठी न्यायालयाने ही परवानगी दिली.

यापूर्वी या तिघांना न्यायालयाने जामिनावर सोडले होते. मात्र तपासात नवीन माहिती हाती लागल्यानंतर या प्रकरणात महाराष्ट्र संरक्षण अनियमित ठेवीदार (एमपीआयडी) अधिनियमांतर्गत कलम ३ आणि ४ अंतर्भूत करण्यात आले. या नवीन कलमांखाली अटक होण्याची शक्यता असून, यासंदर्भात त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज न केल्यामुळे अटकेची परवानगी मिळाली आहे. नगर कोर्टात दाखल गुन्हा क्रमांक १२१/२०२२ संदर्भात सध्या स्पेशल केस क्र. ९२/२०२४ चे कामकाज सत्र न्यायाधीश एम. एच. शेख यांच्यासमोर सुरू आहे. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. मंगेश दिवाणे व फिर्यादी व ठेवीदारांच्या बाजूने ॲड. अच्युत पिंगळे काम पाहत आहेत.

# नगर अर्बन बँकेच्या कर्जदाराचा जामीन रद्द

नगर – नगर अर्बन बँकेचे कर्जदार असलेले सुशिल घनशाम अगरवाल यांना न्यायालयाने मंजूर केलेला अटकपूर्व जामीन रद्द करण्यात आला आहे. न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर करताना घातलेल्या अटींची पूर्तता त्यांनी विहित मुदतीत केली नसल्याने त्यांचा जामीन रद्द करण्यात आला आहे. नगर अर्बन बँकेच्या दाखल गुन्ह्याचे कामकाज सत्र न्यायाधीश एम. एच. शेख यांच्यासमोर सुरू आहे. सदरच्या केसमध्ये सुशिल घनशाम अगरवाल यांनी कोर्टात अटकपुर्व जामीन अर्ज दाखल केलेला होता. यावेळी आगरवाल यांचेतर्फे कर्जाची सर्व रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती व कोर्टाने त्यांचे या म्हणण्यावर विश्वास ठेवून त्यांना अटकपूर्व जामीन दिलेला होता. मात्र ही अट व शर्त असतांना त्यांनी पैसे भरण्यास चालढकल केल्याने त्यांचा जामीन रद्द करण्यात आला. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. मंगेश दिवाणे व फिर्यादी व ठेवीदारांच्या बाजूने ॲड. अच्युत पिंगळे काम पाहत आहेत.

# दहावी बारावी नंतर पुढे काय?

आज जगात सर्वात जास्त लोकसंख्या आपल्या देशाची असल्याने बेरोजगारीचा प्रश्न कायम असणार आहे. आपल्याकडे शिकलेल्या हातांना काम नाही आणि कामासाठी योग्य हात मिळत नाहीत. अशी परिस्थिती आहे. म्हणून सुजान पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी दहावी पासूनच आपली आवड, गरज, क्षमता व काळाची पावले ओळखून कौशल्य विकासाची आणि योग्य अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्यांना त्वरित नोकरी, रोजगार मिळेल. तसेच त्यांना स्वतःचा स्टार्टअप म्हणजे व्यावसायिक चालू करता येईल. म्हणून दहावी बारावीनंतर योग्य तेच शिक्षण घेणे गरजेचे आहे.

दहावीनंतर झटपट नोकरी हवी असेल तर आयटीआयचे एक किंवा दोन वर्षाचे असे २९ अभ्यासक्रम आहेत. त्यामधून तुमची आवड क्षमता व काळाची गरज ओळखून अशा कौशल्य आधारित शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलांना औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये, सैन्य दलापासून महावितरण अशा सरकारी निमसरकारी आणि विविध क्षेत्रातील खाजगी नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. या कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या आधारे तुम्ही स्वतःचा व्यवसाय पण सुरू करू शकता.

### आयटीआय मधील महत्त्वाचे ट्रेड

इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिशियन, वायरमन, फिटर, वेल्डर, मेकॅनिक, मशीन ऑपरेटर, प्लंबिंग, ॲडव्हान्स मशीन टूल्स, मेंटेनन्स, मशीनिस्ट, फूड अँड व्हेजिटेबल प्रोसेसर तसेच सिक्रेटरीअल, स्टेनोग्राफर, इत्यादी. सरकारी आयटीआयमध्ये शिकताना रुपये पाचशे इतके विद्या वेतनही मिळते.

### १२ वी नंतर काय?

एक जमाना होता की बीए, बी कॉम, बीएससी, मेडिकल आणि इंजिनिअरिंग असे सरधोपट शिक्षण घेतलेल्या तरुणांना नोकऱ्या मिळत होत्या. आता नवनवीन क्षेत्र उदयाला येत आहेत. त्यामुळे त्यांना हवे असलेले कौशल्य प्राप्त तरुण मिळत नाहीत. म्हणून आपली आवड, क्षमता, गरज व काळाची पावले ओळखून योग्य तो अभ्यासक्रम म्हणजे डिप्लोमा (पदविका), डिग्रीची (पदवी), किंवा कोर्सेसची निवड करून विद्यार्थ्यांनी त्यांचे करिअर करावे. त्यामध्ये

१) योगा आणि नॅचरोपॅथी : देशात आणि परदेशात योग गुरूंची प्रचंड मागणी आहे २) ॲनिमेशन ३) ग्राफिक डिझाईनिंग ४) डिजिटल मार्केटिंग ५) AI आर्टिफिशियल इंटेलिजन्स : म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता येणाऱ्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. ६) सायबर सिक्युरिटी : इंटरनेट google चॅट जीपीटीच्या जमान्यात ऑनलाइन प्रॉडक्टचे प्रमाण प्रचंड वाढल्यामुळे सायबर सिक्युरिटी एक्सपोर्टसचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ७) व्हिडिओ एडिटिंग ८) फोटोग्राफी ९) यु ट्यूबर, कंटेंट रायटर १०) मास कम्युनिकेशन म्हणजे पत्रकारिता. ११) हॉटेल मॅनेजमेंट. १२) बारावी सायन्स पीसीबी ग्रुप मधून : एमबीबीएस, बीडीएस, बीएएम, डीएचएमएस, बी फार्मसी, डी फार्मसी, नरसिंग, फिजिओथेरपी १३) बारावी सायन्स: पीसीएम ग्रुप मधून: पॉलिटेक्निक (तंत्रनिकेतन), बीइ, बीटेक, बीसीएस, बी. आर्च, कम्प्युटर हार्डवेअर, कम्प्युटर सॉफ्टवेअर. रोबोटिक इंजिनियर, डेटा अनालिसिस. इत्यादी. १४) बायोटेक्नॉलॉजी (जैविक तंत्रज्ञान) १५) जिओलॉजी १६) फूड टेक्नॉलॉजी १७) टेक्स्टाईल (कापड उद्योग) १८) मायक्रोबायोलॉजी १९) आर्किटेक्चर, इंटिरियर डिझायनर. २०) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (IT) २१) नॅशनल डिफेन्स अकॅडमी (NDA) : आर्मी, नेव्ही, एअरफोर्स कमर्शियल पायलट. बारावी सायन्स नंतरचे प्रवेश आता ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेऊन दिले जातात चांगले मार्क मिळाले म्हणजे प्रश्न मिटला असे नव्हे तर त्यानंतरची NEET, CET, JEE या प्रवेश परीक्षा देऊन चांगली डिग्री व चांगले कॉलेजही मिळू शकते म्हणून प्रवेश परीक्षेला आता खूपच महत्त्व आलेले आहे. २२) बारावी कॉमर्स नंतर : बीकॉम, बीबीए, एमबीए, सीए, सीएस २३) बारावी आर्ट्स (कला) : बीए, डीएड, बीएड. एमएड.

वरील माहिती तोटक आहे तुम्ही जास्तीची माहिती गुगल यूट्यूब आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅट जी पी टी तसेच सरकारी व वेगवेगळ्या कंपन्यांच्या वेबसाईटवरून माहिती घेऊन योग्य शिक्षण घेतल्यास तुमचे करिअर निश्चित आणि उत्तम घडू शकते.

– **एन. बी. धुमाळ,** मो. ९४२३१६२५४८, उद्योजक वक्ता आणि लेखक

# श्री श्री उत्कर्ष मॅथ्स ॲकॅडमीची १००% निकालाची परंपरा कायम


अथर्व लोंढे


निहाल शेख


पूजा लगड

नगर – यंदाच्या इयत्ता १० वी (SSC २०२४-२५) च्या परीक्षेत श्री श्री उत्कर्ष मॅथ्स अकॅडमी, अहिल्यानगर या संस्थेने १००% निकालाची परंपरा यशस्वीरित्या कायम राखली आहे.

प्रमुख गुणवंत विद्यार्थी म्हणून अथर्व लोंढे, निहाल शेख आणि पूजा लगड या विद्यार्थ्यांनी ९८ गुण मिळवत संस्थेचे नाव उज्ज्वल केले. डायमंड विद्यार्थी (९१ ते ९७ गुण): अनुष्का पोळ – ९७, सई गवळी – ९७ विष्णू पांडे – ९७, सृष्टी ढगे – ९५, शिवम सुसरे – ९५, प्रणव चुत्तर– ९४, रुद्रा मोरे – ९४, तनिष्का गिरवले – ९४, निनाद कुलकर्णी – ९२, कल्याणी पठारे – ९१, शरयू ताकटे – ९०, गोल्डन विद्यार्थी (८० ते ८९ गुण): विधी पांडे – ८९, प्रणव तवर – ८८, श्रावणी डहाळे – ८७, आयुष शिंपी – ८७, रागिणी नट– ८३, युवराज शिंदे – ८३, प्रांजल लाटे – ८२, सुयश ठाणगे – ८१, सृष्टी बडे – ८०. या यशामागे मोलाचे योगदान ठुबे सरांचे प्रभावी मार्गदर्शन, अभ्यासाचे शिस्तबद्ध नियोजन, आणि मॅथेमॅटिक्स मधील खास ट्रिक्स व टिप्स यांचे आहे. सरांचे 'कंसेप्ट क्लिअर करा, सोडवण्याच्या पद्धती समजून घ्या' हे तत्त्व विद्यार्थ्यांना नुसतेच गुण मिळविण्यात नव्हे, तर विषय समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरले.

८ वी ते १२ वी पर्यंत STATE व CBSE बोर्डासाठी मार्गदर्शन करणाऱ्या उत्कर्ष मॅथ्स अकॅडमीमध्ये आता नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश सुरू झाले आहेत. विद्यार्थी व पालकांनी योग्य निर्णय घेऊन प्रवेशासाठी लवकर संपर्क साधावा, असे ॲकॅडमीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

गेल्या २६ वर्षापासून १०० टक्के निकालाची परंपरा असलेली ठुबे सर यांची ही ॲकॅडमी श्री स्वामी शंकर महाराज मठ रोड, वॉटर टँक जवळ, भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर येथे असून, ठुबे सर त्यांच्याशी ९४२२२२९३१५.

# 'रोबोटिक्स अँण्ड ऑटोमेशन' आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँण्ड मशीन लर्निंग'ला नेप्ती येथील छत्रपती अभियांत्रिकीमध्ये मान्यता

नगर – नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स अँण्ड ऑटोमेशन त्याचबरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँण्ड मशीन लर्निंग या अभ्यासक्रमांना तंत्र शिक्षण परिषद (AICTE) ने मान्यता दिली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी भविष्यातील रोजगाराच्या संधी ओळखून या नवीन अभ्यासक्रमाचा निर्णय घेतला आणि या विद्यार्थ्यांच्या हिताच्या निर्णयास अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्था सदस्य-पदाधिकारी यांनी देखील संस्था स्तरावरून परवानगी दिली.

रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध करून देणारे रोबोटिक्स अँण्ड ऑटोमेशन व आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग हे दोन नवे कोर्सेस महाविद्यालयामध्ये सुरू झालेले आहेत आणि शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. जवळपास १५ वर्षांची उज्वल परंपरा असलेले श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय वेगवेगळे कोर्सेस महाविद्यालयाअंतर्गत चालवते आणि गेल्या २ वर्षापासून महाविद्यालयामध्ये नव्याने सुरू केलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँण्ड डेटा सायन्स या कोर्सला मिळालेल्या प्रतिसादामुळे महाविद्यालयाने नवीन दोन कोर्स सुरू करण्याचा निर्णय घेतला. या दोन्हीही कोर्सला बारावीनंतर सीईटी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया मार्फत प्रवेश घेता येणार आहे.

भविष्यातील विविध नोकरीच्या संधी ओळखून विद्यार्थ्यांनी या दोन्हीही कोर्सेसचा प्रवेशासाठी निश्चित विचार करावा, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले.

# न्यू आर्टस्च्या रसायनशास्त्र विभागातील ९३ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीत निवड


न्यू आर्टस्च्या रसायनशास्त्र विभागातील ९३ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीत बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत प्राध्यापक.

नगर – रसायनशास्त्र विभागातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील पदवी व पदव्युत्तर वर्गातील एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री, इनऑरगॅनिक केमिस्ट्री, ड्रग केमिस्ट्री, मेडिसिनल केमिस्ट्री, ॲनालॉटिकल केमिस्ट्री व बायोकेमिस्ट्री या विद्या शाखेतील ९३ विद्यार्थ्यांची रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट केमिस्ट, क्वालिटी कंट्रोल केमिस्ट आणि प्रॉडक्शन केमिस्ट या पदावर कॅम्पस मुलाखतीव्दारे विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

महाविद्यालय व रसायनशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कॅम्पस मुलाखतीमध्ये ओटूएच फार्मा प्रा. लि. अहमदाबाद, गुजरात, अरेंजिन लाईफ सायन्स, बगळरु आणि हैद्राबाद, ज्युबिलंट बायोसिस, नोयडा, नवी दिल्ली, मॅक्लॉईड फार्मास्युटिकल्स, मुंबई, पिरामल फार्मा, मुंबई, कॅलिक्स केमिकल्स प्रा. लि., ठाणे, सन फाम स्युटिकल्स, अहिल्यानगर, एमक्युर फार्मास्युटिकल्स, एन्झिन वायोसायन्ससेस, पुणे, फुकोकु इंडिया, टाटा मोटर्स आदि बहुराष्ट्रीय कंपन्या सहभागी झाल्या होत्या निवड झालेल्या विदयार्थ्यांना त्वरित नियुक्तीपत्र देण्यात आले. रसायनशास्त्र विभागामार्फत दरवर्षी नामांकित कंपन्यांना बोलावून ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने मुलाखतीच्या माध्यमातून विदयार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच सद्यस्थितील उपलब्ध नोकरीच्या संधीबाबत मार्गदर्शन केले जाते. रसायनशास्त्र विभागात पदवी व पदव्युत्तर वर्गामध्ये प्रवेशित विदयार्थ्यांपैकी ९५% विदयार्थी या कॅम्पस मुलाखतींमधून विविध कंपन्यामध्ये निवडले गेले असून प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध झाली असल्याचे प्रतिपादन विभागप्रमुख प्रा. सुषमा दरे यांनी केले.

विज्ञानशाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल आठरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविदयालय व रसायनशास्त्र विभाग नेहमीच प्रयत्नशील व कटिबध्द असल्याने नमुद केले

प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी निवड झालेल्या विदयार्थ्यांचे अभिनंदन केले व सहभागी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले. महाविद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच उत्तम रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात अग्रेसर असल्याचे सांगितले

कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त व कार्यकारणी सदस्यांनी अभिनंदन केले. कॅम्पस मुलाखती आयोजित करण्यासाठी वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, कला शाखेचे समन्वयक डॉ. किसन अंबाडे यांचे मार्गदर्शन लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. विभागातील शिक्षकेतर सेवकांनी कॅम्पस मुलाखती यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता सहकार्य केले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती विद्यमान मालक **श्री. सचिन नेमीचंद भळगट,** रा. सर्व्हे नं. ५६६, फ्लॅट नं. ३, कृष्णकुंज अपार्टमेंट, वास्तुनगर, बिबेवाडी, मार्केटयार्ड, पुणे. ४११०३७ यांचे मालकी वहिवाटीच्या आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन सदरचा मिळकतीचा खरेदी विक्रीचा करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाई हुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकत वर्णन :** डि. अहिल्यानगर सब डि।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **शहर अहमदनगर** येथील मे. दु. निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील मिळकतीच्या वर्णन खालील प्रमाणे.

**सि.स.नं. २४१/२ चे क्षेत्र १४४.१० चौ. मी. यावर बांधलेल्या शांती निकेतन या अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. एफ - ३ चे बिल्टअप क्षेत्र ५३.२५ चौ. मी. या फ्लॅट मिळकती बाबत.**

**यांसी चतु:सीमा -**

पूर्वेस : सि.स.नं. २४५२ — दक्षिणेस : लेन.

पश्चिमेस : स्टेअर केस व युनिट नं. एफ-२ — उत्तरेस : सि.स.नं. व ओपन टु स्काय

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि.२१/०५/२०२५

अहमदनगर.

**ॲड. हर्षद आर. कटारिया**
२०८, करण कोर्ट बिल्डींग, जुन्या कोर्टासमोर,
दादा चौधरी शाळेजवळ, अहमदनगर. मो. ९८८१३७७७७२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील, **टी. पी. स्कीम नं. ४** मधील **फायनल प्लॉट नं. १०९** चे क्षेत्रफळ २६९१५.४५ चौ.मीटर. यापैकी सब प्लॉट नं. २१ चे क्षेत्रफळ १७५.०० चौ. मीटर. व **सब प्लॉट नं. २२**चे क्षेत्रफळ १७५.०० चौ. मीटर. असे एकुण मंजुर एकत्रीकरण नकाशा प्रमाणे क्षेत्रफळ ३५०.०० चौ.मीटर. व यावरील आर.सी.सी. मधील संपुर्ण बांधकाम याचे क्षेत्रफळ २०२.३८ चौ. मीटर. **मातोश्री बंगला** नावाची इमारत. सदर विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे.

सदर मिळकतीचे मुळ मालक वसंत धनाजी गायकवाड हे होते. सदर मिळकत वसंत धनाजी गायकवाड यांचेपासुन दि. २५/०७/१९९५ रोजी प्रमिला कारभारी भिंगारे व कारभारी मथुजी भिंगारे यांनी खरेदीने घेतलेली होती व तदनंतर दि. ०१/११/१९९६ रोजी वंदना सावकार वाघमोडे व सावकार महादेव वाघमोडे यांनी खरेदीने घेतलेली होती. सावकार महादेव वाघमोडे यांनी त्यांच्या हयातीत सांगली अर्बन को-ऑप बँक लि. शाखा पुणे यांचे कर्ज घेतले होते. व वंदना सावकार वाघमोडे यांनी धनसंपदा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर यांचे कर्ज घेतले होते. सदर कर्जाची वेळेवर परतफेड न झाल्यामुळे सांगली अर्बन को-ऑप बँक लि. शाखा पुणे व धनसंपदा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर यांनी वरील मिळकत जप्त केली. व दरम्यानचे काळात सावकार महादेव वाघमोडे यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे वारस अक्षय सावकार वाघमोडे व अश्विनी अभिजीत काळे व वंदना सावकार वाघमोडे यांचे विरुद्ध वसुलीची कारवाई करुन सांगली अर्बन को-ऑप बँक लि. शाखा पुणे व धनसंपदा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर यांनी वरील मिळकतीचा लिलाव केला व लिलाव दाखल्याद्वारे दि. ३०/०३/२०२५ खरेदीखत द.नं. २८२३/२०२५ अन्वये **विद्यमान मालकांनी** खरेदीने घेतली आहे.

सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २१/०५/२०२५**

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**संतोष लहानू सुर्यवंशी** रा. छबाई बंगला भवानीनगर, अहिल्यानगर.
**जगदीश रामविलास करवा** रा. पद्मावतीनगर, फलटण, जि. सातारा.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
**ॲड. अंकिता अनिल शर्मा (जैन)**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४, १७ पहिला मजला, श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या शेतजमिन मिळकती विद्यमान मालक **उषा दालचंद शर्मा, रा. मुलुंड, मुंबई.** यांच्या मालकीची असुन सदर शेतजमिन मिळकतींचा व्यवहार आमंच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, खरेदी, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर शेतजमिन मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील, **मौजे निंबळक, ता. नगर** येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकती -

**अ) गट नंबर १७५/४ चे क्षेत्र ० हे. ४० आर याचा आकार ० रु. १० पैसे ही विद्यमान मालक यांच्या मालकीची संपूर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं. १७५/८, — दक्षिणेस – गट नं. १७५/३,
पश्चिमेस – गट नं. १७४, — उत्तरेस – गट नं. १७५/५,

**ब) गट नंबर १७५/५ चे क्षेत्र ० हे. ४० आर याचा आकार ० रु.१० पैसे ही विद्यमान मालक यांच्या मालकीची संपूर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं. १७५/९, — दक्षिणेस – गट नं. १७५/४,
पश्चिमेस – गट नं. १७४, उत्तरेस – गट नं. १७५/६,

**क) गट नंबर १७५/६ चे क्षेत्र ० हे. ४० आर याचा आकार ० रु.१० पैसे ही विद्यमान मालक यांच्या मालकीची संपूर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं. १७५/१०, — दक्षिणेस – गट नं. १७५/५,
पश्चिमेस – गट नं. १७४, — उत्तरेस – गट नं. १७१,

**ड) गट नंबर १७५/७ चे क्षेत्र ० हे. ४० आर याचा आकार ० रु.१० पैसे ही विद्यमान मालक यांच्या मालकीची संपूर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं. १८२, — दक्षिणेस – गट नं. १७५/२,
पश्चिमेस – गट नं. १७५/३, — उत्तरेस – गट नं. १७५/८,

दि.२१/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. तुषार अशोक महानुर**
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर.
मो.नं. ९२८४१२५९८९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **लियाकत शमशुद्दीन शेख, रा. घासगल्ली, कोठला, अहमदनगर** यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आपच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) **दिवसांचे आत** खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन:**- जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **नागरदेवळे** येथील खुल्या प्लॉट मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे.

**सर्व्हे नंबर १०३ ते १०४ मधील खालील वर्णनाचा प्लॉट -**

| प्लॉटनंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | यासी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १३८ | १५४.०० | प्लॉट नं. १३८ | प्लॉट नं. १३९ | रस्ता | प्लॉट नं. १३५ |
| हा संपूर्ण प्लॉट. | | | | | |

दि.२१/०५/२०२५. अहमदनगर.

**ॲड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर. मो.नं. ९२७०४६४६००

**ॲड. मोहसीन आय. शेख**
**ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर. मो.नं. ८०८७७४२४२८


## दहावीच्या परीक्षेत हर्ष चोरबेलेला ९६%



नगर – CBSE पॅटर्नचा दहावीच्या परीक्षेत आयकॉन पब्लिक स्कूलचा विद्यार्थी हर्ष चोरबेले हा ९६% गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. त्यास गणितात ९९ मार्क मिळाले आहे. इंग्लिश या विषयात ९८ मार्क मिळवले आहे. सर्व शिक्षकांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन लाभले. हर्ष हा सुपा येथील राकेश फॅशन अँण्ड क्लॉथ सेंटरचे मालक राकेश सुभाषलाल चोरबेले यांचा मुलगा व व्यापारी सुभाषलाल चोरबेले यांचा नातू आहे.

# विखे पाटील आय.टी.आय मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

### ३६८ जागांसाठी संधी

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), एमआयडीसी, अहमदनगर येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ३६८ जागांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांना संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य ए. व्ही. सुर्यवंशी यांनी केले आहे.

प्राचार्य सुर्यवंशी पुढे म्हणाले की, आजच्या काळात तांत्रिक शिक्षण ही अत्यंत आवश्यक बाब बनली आहे. तांत्रिक कौशल्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तम पगाराच्या संधी मिळतात. शिक्षण पूर्ण होताच रोजगाराच्या संधी मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्वल होते.

विखे पाटील आयटीआय एमआयडीसी परिसरात स्थित असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणाचा लाभ मिळतो. संस्थेमार्फत उत्कृष्ट शिक्षण, अनुभवी शिक्षकवर्ग, उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी नगर, सुपा, पुणे, औरंगाबाद आणि मुंबईसारख्या शहरांतील नामांकित कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.

ऑगस्ट २०२५ प्रवेश सत्रासाठी खालील कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे:

इलेक्ट्रीशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, फिटर, वायरमन, वेल्डर, कॉम्प्युटर ऑपरेटर व प्रोग्रॅमिंग असिस्टंट, टर्नर, मशिनिस्ट, रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग टेक्निशियन, मेकॅनिक मोटार व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, पेंटर जनरल, ड्राफ्ट्समन मेकॅनिकल. या प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांना २६ मे पासून व्यवसाय पसंती नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे किंवा (०२४१)२७७९४३२

# दहावी बोर्ड परीक्षेत यतिमखाना संचलित अहमदनगर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

### अरबिना शेख व आसिया शेख ७३.८०% गुण मिळवून शाळेत प्रथम

नगर – अहमदनगर यतिमखाना संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) या विद्यालयाचा मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० वी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल ९० टक्के लागला. विद्यार्थ्यांनी उत्तमप्रकारे गुण मिळवून यश संपादन केले.

शेख अरबिना समीर व शेख आसिया रहीम या दोघांनी ७३.८०% गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. खान नगमा सलीम ६८.८०% हिने द्वितीय व कुरेशी मेहेक रमजान ६५.८०% ही तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

अहमदनगर यतिमखाना संस्थेचे चेअरमन हाजी सय्यद अलीमभाई, संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि संचालक तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सय्यद शाहीदा आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरू

नगर – आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता मिळालेली आहे. यंदाच्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे पासून ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे याची माहिती संस्थेचे संस्थापक प्रा. अनिरुद्ध आडसूळ यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी २० मे ते १६ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. तसेच कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन प्राचार्य आर. एस. गडाख यांनी केले आहे.

सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतनमधील अद्ययावत संगणकीय साधन सामग्री, इंटरनेट सुविधा, प्रशिक्षित व योग्य सुसंवाद साधणारा प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांची सुसज्ज बैठक व्यवस्था या सर्व सुविधा लक्षात घेऊन तंत्रशिक्षण विभागाने हे सुविधा केंद्र सुरू करण्यास परवानगी दिली आहे. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या अंतर्गत गुण मूल्यमापनाचा आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्याने ऑनलाईन पद्धतीने १६ जूनपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य असेल.

पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कुठल्याही प्रकारची सी.ई.टी. परीक्षा नसेल. इच्छुकांनी सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतन चास, अहमदनगर येथे संपर्क साधावा. प्रवेशाकरिता सुविधा केंद्रामार्फत आवश्यक असणारे कागदपत्रे व इतर माहितीसाठीचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईल.

आडसूळ पॉलिटेक्निक विद्यालयामध्ये यंत्र अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेली कम्युनिकेशन इत्यादी शाखा २०१० पासून उपलब्ध आहेत.

अधिक माहितीसाठी ९८५०२३५५५३ वर संपर्क साधावा.

# कॅलिडोस्कोप



## सहा दशकांनी हजर!

एखादी व्यक्ती अचानक गायब झाली तर? अर्थातच काही दिवस त्या व्यक्तीचा शोध घेतला जाईल, नातेवाइकांशी संपर्क साधून विचारणा केली जाईल, पोलिसात तक्रार दिली जाईल. एवढं सगळं करूनही ती व्यक्ती अनेक महिने सापडली नाही तर ती या जगात नाही असं मानलं जाईल. पण कधी कधी अशा काही गोष्टी कानावर पडतात की, त्यांच्यावर विश्वास ठेवणंही कठीण होऊन जातं. एक अशीच गोष्ट आहे, ऑड्री बॅकबर्गची.

ऑड्री १९६२ मध्ये अचानक घरातून गायब झाली. घरातून गायब झाली तेव्हा ती फक्त २० वर्षांची होती; पण ६० वर्षांनंतर असं काही घडलं की सगळेच थक्क झाले. ही थक्क करणारी घटना आहे अमेरिकेच्या विस्कॉन्सिनमधील. ऑड्री गायब झाल्यानंतर कुटुंबाने तिचा बराच शोध घेतला; पण ऑड्रीची कुठेच पत्ता लागला नाही. तिचा शोध घेऊन घरचेच नाही तर पोलिसही थकून गेले. हे प्रकरण 'कोल्ड केस' बनले; पण तब्बल ६० ऑड्री अचानक वर्षांनंतर सापडली.

ऑड्री सापडली, तेव्हा ती ८२ वर्षांची होती. तिच्या कुटुंबीयांसाठी तर हा एक चमत्कारच होता. ऑड्री सापडली, तेव्हा तिने फक्त दोनच शब्द उच्चारले. ते म्हणजे 'नो रिग्रेट्स.' कोणताही पश्चात्ताप नाही. १९६२ मध्ये एक दिवस कुटुंबातील बेबीसिटरने पोलिसांना सांगितले, की तिने ऑड्रीला मॅडिसन, विस्कॉन्सिपर्यंत लिफ्ट दिली होती. तिथे दोघींनी इंडियाना पोलिसला जाणारी ग्रेहाऊंड बस पकडली होती. तिथे गेल्यावर ऑड्री कुठे तरी निघून गेली. त्यानंतर ती परत कधीच दिसली नाही. ऑड्री आपल्या मुलांना सोडून कधीच जाणार नाही, असं तिच्या कुटुंबीयांना वाटत होतं; पण बेबीसिटरची कबुली आणि दस्तावेज काही वेगळीच कहाणी सांगत होते.

**छळामुळे सोडले घर**

२०२४ च्या सुरुवातीला सॉक काउंटी शेरिफ ऑफिसने ही कोल्ड केस पुन्हा उघडण्याचा निर्णय घेतला. आयजॅक हॅनसन या डिटेक्टिव्हकडे केसची जबाबदारी दिली गेली. जुने दस्तावेज पाहून अत्यंत सखोल तपासणी करण्यात आली. साक्षीदारांना पुन्हा साक्ष देण्यासाठी बोलावण्यात आलं. डिजिटल रेकॉर्ड्स शोधण्यात आले. ऑड्रीचे लग्न वयाच्या १५ व्या वर्षी रोनाल्ड बॅकबर्ग याच्याशी झालं होतं. या लग्नावर ती अजिबात खूश नव्हती. ऑड्री कौटुंबिक आणि मानसिक छळामुळे त्रासलेली होती, असं तपासात आढळून आलं.

**असा लागला शोध**

ऑड्रीच्या बहिणीने तयार केलेले न्सेस्ट्री. कॉम हे अकाऊंट या केससाठी टर्निंग पॉइंट ठरलं. डिटेक्टिव्ह हॅनसने डीएनए मॅच करून ऑड्री जिवंत असल्याची शक्यता पडताळून पाहिली केली. त्यांनी स्थानिक पोलिसांशी संपर्क साधून एका पत्त्याची पुष्टी केली. त्यानंतर १० मिनिटांनी त्या पत्त्यावर राहणाऱ्या एका महिलेने डिटेक्टिव्हला फोन केला. दोघांमध्ये ४५ मिनिटं बोलणं झालं. त्या वेळी ऑड्रीने आपणच हरवलेली ऑड्री असल्याचं कबूल केलं. माझ्या इच्छेनेच मी सर्व काही सोडून निघून गेले होते, असंही तिने स्पष्ट केलं.

**प्रकरणावर पडदा**

मी घेतलेला (घर सोडून जाण्याचा) निर्णय माझ्यासाठी योग्यच होता. आता मी केवळ सुरक्षितच नाही तर खूशही आहे, असं तिने स्पष्ट केलं. त्यानंतर सॉक काउंटीचे शेरिफ चिफ मास्टरने एक निवेदन दिलं. ऑड्री जिवंत आसून एका वेगळ्या राज्यात ती सुखाचं आयुष्य जगत आहे. ती स्वेच्छेने घर सोडून गेली होती. यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडलेला नाही आणि कोणतंही षडयंत्र नाही, असं या निवेदनात म्हटलं होतं.



## तीन हजार बॉंब टाकूनही मंदिर शाबूत

राजस्थानमधील जैसलमेरमध्ये भारत–पाकिस्तान सीमेवर वसलेलं तनोट माता मंदिर एक रहस्यमयी आणि चमत्कारिक स्थळ आहे. १९६५ आणि १९७१ च्या भारत–पाकिस्तान युद्धांदरम्यान पाकिस्तानी सैन्याने या मंदिरावर हजारो बॉम्ब टाकले; परंतु एकाही बॉम्बचा परिणाम मंदिरावर झाला नाही. विशेष म्हणजे, मंदिराच्या आवारात पडलेल्या काही बॉम्बचा स्फोटही झाला नाही. या चमत्कारामुळे तनोट माता मंदिराची ख्याती देशभरात पसरली. या मंदिरावर तब्बल ३,००० बॉम्ब टाकण्यात आले; परंतु एकाही बॉम्बचा स्फोट मंदिराला हानी पोहोचवू शकला नाही. यापैकी ४५० बॉम्बचा तर स्फोटच झाला नाही. हे बॉम्ब आजही तनोट माता मंदिरातील संग्रहालयात जतन केलेले आहेत.

**१९६५ च्या युद्धातील चमत्कार**

१९६५ च्या भारत–पाकिस्तान युद्धादरम्यान पाकिस्तानी सैन्याने तनोट माता मंदिरावर तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून हल्ला केला. या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी मेजर जय सिंह यांच्या नेतृत्वाखाली १३ ग्रेनेडियरची एक कंपनी आणि सीमा सुरक्षा दलाच्या दोन कंपन्या तैनात होत्या. त्यांनी पाकिस्तानच्या संपूर्ण ब्रिगेडचा सामना केला. या युद्धात पाकिस्तानी सैन्याने मंदिरावर ३,००० बॉम्ब टाकले; परंतु मंदिराला कोणतीही हानी पोहोचली नाही. हा चमत्कार पाहून सैनिक आणि स्थानिकांमध्ये मंदिराविषयीची श्रद्धा अधिक दृढ झाली.

**पाकिस्तानी सैन्याचा पराभव**

१९६५ च्या युद्धात पाकिस्तानी सैन्याने या परिसरावर कब्जा करण्याच्या उद्देशाने हल्ला केला होता. त्यांचे सैन्य भारतीय सीमेत चार किलोमीटरपर्यंत घुसले होते; मात्र भारतीय सैन्याने जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तानी सैन्याचं मोठं नुकसान केलं. त्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली. या युद्धानंतर तनोट माता मंदिराच्या संरक्षणाची जबाबदारी सीमा सुरक्षा दलाने स्वीकारली. आजही जवान मंदिराची देखभाल, स्वच्छता आणि रोजच्या आरतीचं आयोजन करतात.

**तनोट माता मंदिराची ख्याती**

१९६५ आणि १९७१ च्या युद्धांनंतर तनोट माता मंदिराची ख्याती देशभरात पसरली. स्थानिकांसह देशभरातील भाविक या मंदिराला भेट देण्यासाठी येतात. मंदिराच्या चमत्कारिक कथा आणि युद्धकाळातील घटनांनी या स्थळाला एक विशेष स्थान मिळवून दिलं आहे. मंदिरातील संग्रहालयात ठेवलेले स्फोट न झालेले बॉम्ब मंदिराच्या दैवी शक्तीचं प्रतिक मानले जातात.

## मौजमजेच्या वयात 'ती' बनली सीए!





१८–१९ वर्षे म्हणजे कॉलेजमध्ये मजा मस्ती करण्याचं वय; पण याच वयात कोणी सीए झालं तर? अनेकजणांची सीए बनताना वयाची तिशी उलटते; पण नंदिनीने वयाच्या १९ व्या वर्षी सीए होऊन जागतिक विक्रम केला आहे.

नंदिनी अग्रवाल ही ही मध्य प्रदेशातील मुरैनाची रहिवाशी आहे. ती १९ वर्षांची असताना जगातील सर्वात तरुण महिला चार्टर्ड अकाउंटंट (सीए) बनली. या विक्रमाची 'गिनीज बुक'नेही नोंद घेतली आहे. नंदिनी लहानपणापासून अभ्यासू विद्यार्थिनी आहे. त्यामुळे तिला शाळेत एकाच वर्षात दोन वर्षं पुढे जाण्याची संधी मिळाली. नंदिनीने वयाच्या १३ व्या वर्षी दहावी बोर्डाची परीक्षा दिली, तर वयाच्या १५ व्या वर्षी १२ वीची परीक्षा पूर्ण केली.

आपले समवयस्क जे शिक्षण घेतात, त्यापेक्षा जास्तीचे शिक्षण घेण्यात नंदिनीला पहिल्यापासून रस होता. त्यामुळे ती नेहमी एक पाऊल पुढचा विचार करायची. या गोष्टीचा आयुष्यात तिला फायदा झाला. इतर मुलांपेक्षा आपल्याला काहीतरी वेगळे करण्याची इच्छा ती नेहमी व्यक्त करत असे. यानंतर तिने सर्वात कमी वयात 'सीए' होण्याचे लक्ष्य ठेवले. वयाच्या १९ व्या वर्षी नंदिनी अग्रवालने 'सीए'ची फायनल दिली. यात ८०० पैकी ६१४ गुण म्हणजेच ७६.७५ टक्के मिळाले. तिने 'ऑल इंडिया रँक १' मिळवला होता.

'सीए'चा निकाल जाहीर झाला, तेव्हा नंदिनी १९ वर्षे आणि ३३० दिवसांची होती. जगातील सर्वात तरुण महिला चार्टर्ड अकाउंटंट होण्याचा बहुमान तिने मिळवला. मोठ्या भावाचा आपल्या प्रवासात महत्त्वाचा वाटा असल्याचं नंदिनी सांगते. 'भाऊदेखील 'सीए' परीक्षेची तयारी करत असल्याने त्याच्यासमोरील आव्हानं मी समजून घेतली. त्याने मला मार्गदर्शन केलं, 'असे ती सांगते. नंदिनीने अंतिम गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला, तर तिच्या भावाने त्याच परीक्षेत १८ वा क्रमांक मिळवला.

## प्राणीही करतात रक्तदान



'रक्तदान हे श्रेष्ठदान' असं म्हटलं जातं. रक्तदानामुळे अनेकांचे जीव वाचू शकतात. माणसांना रक्त अगदी सहज उपलब्ध होतं. पण मुक्या जनावरांचं काय, त्यांना रक्त कोण देणार... मुळात जनावरांनाही रक्ताची गरज असते, याचा विचारही आपल्या मनात येणार नाही. पण या मुक्या जीवांनाही आजारपणात रक्त लागतं. काही देशांमध्ये जनावरांसाठी ब्लड बँक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. ब्लड बँक नसणाऱ्या देशांमध्ये ओळखीद्वारे प्राण्यांना रक्त उपलब्ध करून दिलं जातं. काही देशांमध्ये जनावरांसाठी रक्त आणि प्लाज्मा दान उपक्रमांचं आयोजनही केलं जातं. या उपक्रमांमध्ये लोक आपल्या पाळीव प्राण्यांना घेऊन येतात. पाळीव कुत्रा आणि मांजरं रक्तदान करतात. कुत्रा आणि मांजरांमध्येही माणसांप्रमाणेच रक्तगट असतात. कुत्र्यांच्या रक्तगटाचे बारा प्रकार असतात तर मांजरांच्या रक्तगटाचे तीन प्रकार असतात. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये पशू ब्लड बँक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. पशूंच्या रक्तदानाची प्रक्रिया अगदी सुलभ आहे. या दरम्यान प्राण्यांना भूलही द्यावी लागत नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये प्राण्यांच्या हक्कांबाबत बरीच जागरूकता आहे. त्यामुळे इथले लोक आपल्या पाळीव प्राण्यांना अशा रक्तदान केंद्रांमध्ये घेऊन जातात आणि रक्तदान करवतात. प्राण्यांच्या रक्तदानाचा हा उपक्रम कौतुकास्पद म्हटला पाहिजे.

## म्हणून चोरल्या सायकलच्या सीट

जपानमध्ये एका ६१ वर्षांच्या माणसाने सायकलच्या सीट चोरल्या. त्याच्या घरात सायकलच्या तब्बल १५९ सीट सापडल्या. आता सायकलच्या सीट चोरून त्याला काय मिळालं, हा प्रश्न कोणालाही पडू शकतो. मात्र यामागचं कारण ऐकून तुम्हाला धक्काच बसेल. टोकियोतल्या 'ओटा वार्ड'भागात गेल्या काही दिवसांपासून सायकलच्या सीट्सची चोरी होऊ लागली. मग लोकांनी पोलिसात तक्रार केली.



पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासलं. त्यात एक माणूस सायकलची सीट चोरून नेत असल्याचं दिसलं. पोलिसांनी या माणसाला शोधून काढलं. त्याच्या घराची झडती घेतली. त्याच्या घरात एक, दोन नाही तर १५९ सीट सापडल्या. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि सीट चोरण्याचं कारण विचारलं. त्यावर गेल्या वर्षी आपल्या सायकलची सीट कोणीतरी चोरली. मग सायकलही चोरून नेली. याचा बदला घेण्यासाठी आणि सायकलची सीट चोरल्यावर कसं वाटतं याची जाणीव करून देण्यासाठी आपण इतरांच्या सायकलची सीट चोरायला सुरूवात केल्याचं त्याने सांगितलं. ही सबब ऐकल्यानंतर पोलिसांना हसावं की रडावं हेच कळत नव्हतं.

## रत्नजडित पादत्राणं



शेजारच्या फोटोत दिसणारी ही पादत्राणं साधीसुधी नाहीत. या पादत्राणांवर महागडी रत्न जडवण्यात आली आहेत. इतकंच नाही तर आकाशातून पडलेल्या उल्कापिंडाचे तुकडेही यावर बसवण्यात आले आहेत. त्यामुळे या पादत्राणांचं मोल अनेक पटींनी वाढलं आहे. अत्यंत सुंदर आणि आकर्षक अशा या पादत्राणांची किंमत ऐकून कोणाच्याही भुवया उंचावतील. या रत्नजडित पादत्राणांसाठी १.९९ कोटी डॉलर म्हणजे जवळपास १३१.४४ कोटी रुपये मोजावे लागतील. या पादत्राणांना 'द मून स्टार' हे नाव देण्यात आलं आहे. प्रसिद्ध इटालियन डिझायनर एंतोनियो विएत्रीने ही पादत्राणं डिझाइन केली आहेत. दुबईतल्या मरीनामध्ये या पादत्राणांचं अनावरण करण्यात आलं. ही पादत्राणं बघून उपस्थितांचे डोळे चमकले. ही जगातली सर्वात महागडी पादत्राणं आहेत. या पादत्राणांची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली आहे. याआधी १.५५ कोटी डॉलर म्हणजे जवळपास ११० कोटी रुपयांची पादत्राणं सर्वात महागडी होती. आता त्यांची जागा 'द मून स्टार'ने घेतली आहे. या पादत्राणांमध्ये ३० कॅरेटचे छोटे हिरे बसवण्यात आले आहेत. यासोबतच १५७६ मध्ये अर्जेंटिनामध्ये सापडलेल्या एका उल्कापिंडाचे तुकडेही यावर बसवण्यात आले आहेत. विएत्री अशा महागड्या पादत्राणांची निर्मिती नेहमीच करत असतो. याआधी त्याने २०१७ मध्ये २४ कॅरेट सोन्याची पादत्राणं तयार केली होती. या पादत्राणांची किंमत २३ लाख रुपये होती. आता त्याने तयार केलेल्या 'द मून स्टार'ची चर्चा आहे.

## सर्वात जुनं हॉटेल



सर्वात जुनं हॉटेल जपानमधलं 'निशियामा ओनसेन कियूनकन' हे जगातलं सर्वात जुनं हॉटेल असल्याचं म्हटलं जातं. फुजिवारा महितो नावाच्या व्यक्तीने इसवीसन ७०५ मध्ये हे हॉटेल बांधलं होतं. आज त्यांच्या घराण्याची ५२ वी पिढी या हॉटेलचा सगळा कारभार सांभाळते आहे. १३०० वर्षांपासून एकच कुटुंब हे हॉटेल सांभाळत आहे. या हॉटेलची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली आहे. या अनोख्या हॉटेलमध्ये रहाण्यासाठी जगभरातून बरेच लोक येतात. हॉटेल परिसरात गरम पाण्याचे झरे आहेत. हे या हॉटेलचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. हा हॉटेलच्या एका बाजूला नदी आहे तर दुसऱ्या बाजूला घनदाट जंगल आहे. निसर्गरम्य परिसरातलं हे हॉटेल अनेकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. या हॉटेलमध्ये ३७ खोल्या आहेत. या खोलीचं एका रात्रीचं भाडं भारतीय चलनात ३३ हजार रुपये आहे. अधूनमधून हॉटेलचं नूतनीकरण केलं जातं. १९९७ मध्ये या हॉटेलचं नूतनीकरण करण्यात आलं होतं.

## बारावी नापास, तरी सेलिब्रेशन!



दहावी आणि बारावीचा निकाल लागल्यानंतर चांगले गुण मिळालेले विद्यार्थी आणि त्यांचे पालक पेढे वाटतात. दुसरीकडे कमी गुण मिळालेले अनेक विद्यार्थी आत्महत्येचा प्रयत्नही करतात. या पार्श्वभूमीवर बारावी नापास मुलाच्या पालकांनी मुलगा नापास होऊनही त्याला काहीच न बोलता केक कापून आनंद साजरा केला.

राज्यातील बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. नापास किंवा कमी गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना धीर देण्याचं कामही 'सोशल मीडिया'तून होत आहे. महाराष्ट्रासारख्या काही राज्यातील परीक्षा मंडळांनी विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाचीही सोय केली आहे. परीक्षा बारावीची होती, आयुष्याची नाही. त्यामुळे अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुन्हा नव्याने जोमाने परीक्षेला सामोरं गेलं पाहिजे. परीक्षेत कमी गुण मिळाले, तरी आपल्या आवडीच्या क्षेत्रातील करिअर निवडलं पाहिजे, असं मार्गदर्शन केले जात आहेत.

**कर्नाटकातील उदाहरणच आगळं वेगळं**

बोर्डाच्या परीक्षेकडे भविष्याचा पाया म्हणून पाहिलं जातं. त्यामुळे, बोर्डाच्या परीक्षेत कमी गुण मिळाले किंवा मुलगा वा मुलगी नापास झाल्यास पालक रागावतात. मात्र कर्नाटकच्या बागलकोट येथील एका दाम्पत्याने मुलगा नापास झाल्यावर सेलिब्रेट केलं आहे. विशेष म्हणजे या विद्यार्थ्याला बारावीच्या परीक्षेत केवळ ३३ टक्के गुण मिळाले आहेत.

**खिल्ली उडवणाऱ्यांना चपराक**

बागलकोट जिल्ह्यात राहणाऱ्या अभिषेक चोलाचगुड्डा येथील बसवेश्वर इंग्रजी माध्यम शाळेचा विद्यार्थी आहे. यंदा तो बारावीचं शिक्षण घेत होता. बारावीच्या परिक्षेत त्याला ६०० पैकी फक्त २०० गुण मिळाले आहेत. म्हणजे जवळपास ३३% गुण प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे तो सहाच्या सहा विषयात नापास झाला आहे. त्यामुळे, त्याचे मित्र, काही शेजारी आणि नातेवाइकांकडून त्याची खिल्ली उडवली जाऊ लागली; मात्र आपल्या मुलाची खिल्ली उडवणाऱ्यांना अभिषेकच्या पालकांनी चांगलीच चपराक लावली आहे.

**नाराज न होता सेलिब्रेशन**

आपल्या नापास मुलाच्या गुणवत्तेवर नाराज न होता, केक कापून आई–वडिलांनी त्याचं सेलिब्रेशन केले. तू परीक्षेत नापास झाला असशील; पण आयुष्यातील परीक्षेत होणार नाही, असं म्हणत अभिषेकला त्याच्या आई–वडिलांनी जादू की झप्पी दिली.

**समाजापुढे आदर्श**

एकीकडे मुलांकडून मोठ्या अपेक्षा ठेवून एक–दोन मार्क कमी पडल्यावर पालक रागवतात. आपल्या शेजारील मुलासोबत त्याची तुलना करतात. त्यातून विद्यार्थी तणावग्रस्त होऊन नको ते पाऊल उचलतात; मात्र मुलांची आवड निवड जपून त्यांना हव्या त्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी देणारे असे पालक कमीच असतात. चोलाचगुड्डा कुटुंबीयांनी आज निकालच्या दिवशी समाजासमोर वेगळाच आदर्श ठेवला आहे.

## पैसे कमवण्यासाठी बेड शेअरिंग



कलियुगात काहीही होऊ शकते. बंगळुरूमधील स्मूच कॅबमध्ये जोडप्यांना काहीही करण्याची परवानगी होती; पण आता जोडपी त्यापलीकडे जाऊन काहीतरी करत असल्याचं समोर आलं आहे. या नवीन ट्रेंडला 'हॉट बेडिंग' असं म्हणतात. यात लोक पैसे कमवण्यासाठी त्यांचे बेड भाड्याने देतात. पैसे कमवण्याची ही नवीन संकल्पना ऐकून 'सोशल मीडिया' यूजर्स थक्क झाले आहेत. 'व्हायरल पोस्ट'नुसार, कॅनडातील एका ३७ वर्षीय महिलेने या अनोख्या संकल्पनेबद्दल सांगितलं आहे. कोरोना काळात पैसे कमवण्यासाठी तिने तिच्या बेडचा एक कोपरा भाड्याने देण्यास सुरुवात केली आणि हजारो डॉलर्स कमावले. तिने या संकल्पनेला 'हॉट बेडिंग' असं नाव दिलं आहे.

'व्हायरल पोस्ट'नुसार, या कॅनेडियन महिलेने 'हॉट बेडिंग'द्वारे महिन्याला ५० हजार डॉलर्सपेक्षा जास्त कमाई केली. एवढी मोठी रक्कम ऐकल्यानंतर कोणालाही नक्कीच घाम येईल; मात्र ही बातमी ऐकल्यानंतर यूजर्स वेडे झाले आहेत आणि त्याबद्दल बरीच चर्चा सुरू आहे. 'हॉट बेडिंग'चेही नियम असतात. 'सोशल मीडिया'वर व्हायरल होणाऱ्या पोस्ट पाहिल्यानंतर आणि ऐकल्यानंतर भाड्याने बेड घेऊन लोक काहीही करू शकत नाहीत. यामध्ये बेडचा एक कोपरा भाड्याने घेतला, तरी तुमच्यासोबत झोपणाऱ्या व्यक्तीसोबत तुम्हाला काहीही करण्याची परवानगी नाही.

# पाणीटंचाई व वारंवार वीज खंडितने नागरिक त्रस्त; मनपा व महावितरणच्या कारभाराविरोधात संताप

## प्रश्न न सुटल्यास रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा भाजयुमो केडगाव अध्यक्ष सुजय मोहिते यांचा इशारा



नगर – केडगाव परिसरामध्ये मागील अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण पाणीटंचाई व वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नांकडे प्रशासन व महावितरणचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. या समस्यांबाबत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे केडगाव अध्यक्ष सुजय अनिल मोहिते यांनी महापालिका आयुक्त व महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे तातडीने प्रश्न सोडविण्याची मागणी केली आहे.

केडगावमधील पाण्याची भीषण टंचाई उन्हाळ्याच्या काळात विकोपाला गेली होती. नागरिकांना दररोज पाण्यासाठी आजही भटकंती करावी लागत आहे. मोहिते यांनी सांगितले की, पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करून नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा, यासाठी महापालिकेने तातडीने पावले उचलावी. महापालिकेच्या दुर्लक्षामुळे सामान्य जनतेचा संयम सुटत चालला आहे. जर लवकरच समस्या सोडविण्यात आली नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याप्रकरणी नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. मागील दोन ते तीन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे वाऱ्यामुळे झाडे व त्यांच्या फांद्या विद्युत वाहिन्यांवर पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. मात्र, महावितरणचे कर्मचारी वेळेवर प्रतिसाद देत नसल्याचा आरोप करण्यात आला. विजेचा पुरवठा सुरळीत करण्यास विलंब होत आहे आणि नागरिकांना अंधारात जीवन जगावे लागत आहे.

या दोन्ही गंभीर प्रश्नांकडे महापालिका व महावितरणने त्वरित लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा सुजय मोहिते यांनी दिला आहे.

# राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याने तीव्र नाराजी; अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करा



अ‍ॅड. सुरेश लगड

नगर– सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली या यासंदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अ‍ॅड. सुरेश लगड यांनी केली आहे.

न्यायमुर्ती भूषण गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून, त्यांची एवढ्या मोठ्या उच्च पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे ही बाब आपल्या सर्व महाराष्ट्रीयन यांना भूषणावह आहे. एवढ्या मोठ्या उच्च पदस्त न्यायमूर्तींबाबत राजशिष्टाचार पाळला जाऊ नये, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. राजशिष्टाचार न पाळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी यांना दोषी धरून त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी अ‍ॅड. सुरेश लगड यांनी केली.

खरंतर न्यायमूर्ती महोदय यांनीच घटनेच्या अनुछेद १४२ अन्वये कारवाई करावयास पाहिजे. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या जाहीर नाराजीनंतर आता महाराष्ट्र शासनाने सरन्यायाधीश हे आता कायमस्वरूपी राज्य अतिथी असतील असा आदेश काढून आपली चुक दुरुस्त केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्याचेही अ‍ॅड. सुरेश लगड यांनी म्हटले आहे.

# वाहतूक शिस्त व आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देणारे निवासी प्रशिक्षणाला प्रारंभ

## आरएसपी अधिकारी प्रशिक्षणाचा पोलीस मुख्यालयात १० दिवसांचे व्यापक प्रशिक्षण



नगर – सद्यस्थितीत वाढत्या रस्ते अपघातांची गंभीरता लक्षात घेता, विद्यार्थ्यांच्या मनात वाहतुकीच्या शिस्तीची रुजवण आणि आपत्कालीन प्रसंगी स्वसंरक्षणाचे भान निर्माण व्हावे, यासाठी २१ मे पासून आरएसपी (रस्ता सुरक्षा पथक) अधिकारी निवासी प्रशिक्षण कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे. हे निवासी प्रशिक्षण ३० मे पर्यंत चालणार असून, शिक्षकांसाठी १० दिवसांचे विभागस्तरीय प्रशिक्षण यामध्ये घेतले जात आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनातच वाहतुकीचे नियम, ट्राफिक सेन्स, स्वसंरक्षणाबरोबरच नागरी संरक्षण, पदकवायत, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन व प्रथोमोपचार यासारख्या अत्यावश्यक विषयांबाबत सुसज्ज व जागरूक करणे हा आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या शिक्षण व गृह (पोलीस) विभागाच्या अंतर्गत, महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना–नागपूर व नाशिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण अहिल्यानगर शहरातील पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या नियंत्रणा खाली पार पडणार आहे. प्रशिक्षणाचे नियोजन महाराष्ट्र राज्य आरएसपी अ‍ॅण्ड सीडी, नाशिक विभागाचे प्रशिक्षण प्रमुख सिकंदर अ. शेख, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी व वाहतूक नियंत्रण शाखेचे निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्याध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, प्रशिक्षणाधिकारी सोमनाथ बोंतले, तज्ञ सल्लागार लेखाधिकारी मनोज शिंदे, कार्याध्यक्ष विजयकुमार पोकळे, तसेच प्रकाश मिंड, एकनाथ लगड, राज धस, तुकाराम हरळ, भारत धाडगे, अनुराधा माने व जिल्हा कार्यकारिणी सदस्य हे सर्वजण परिश्रम घेत आहेत. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सुरक्षा, जबाबदारी आणि आपत्ती व्यवस्थापनाचे भान निर्माण करून त्यांना सजग व जबाबदार नागरिक घडवण्यासाठी निश्चितच मोलाची भूमिका बजावणार आहे.


## 'मंगलदिप'च्या कर्जदारास २३ हजार रूपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने कर्जदार किशोर कचरू शिंदे, रा. नागापुर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून २३ हजार रुपये दंड तसेच रक्कम न भरल्यास ७ दिवस साधी कैद भोगण्याची शिक्षा देखील सुनावली आहे. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना दंड रकमेतून २२ हजार रुपये नुकसान भरपाई म्हणुन देण्याचा आदेशही दिलेला आहे. किशोर कचरू शिंदे यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने किशोर शिंदे यांच्याविरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार किशोर शिंदे यांना शिक्षा सुनावली. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली.

फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अ‍ॅड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अ‍ॅड. अमित अडागळे व अ‍ॅड. विलास ढोणे, अ‍ॅड. गौरव हरबा, अ‍ॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# न्या. भूषण गवई यांच्या स्वागताला पाठ फिरवून सत्ताधाऱ्यांकडून उपेक्षा

## प्रोटोकॉलचाच नाही तर सामाजिक सन्मानाचाही भंग केल्याचा आरोप, घटनात्मक पदांचा अवमान केल्याप्रकरणी निषेध



नगर – भारताचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई हे महाराष्ट्र राज्यातील पहिले अनुसूचित जातीचे न्यायमूर्ती या सर्वोच्च पदावर विराजमान झाले असून, त्यांचा महाराष्ट्रातील प्रथम दौरा एक ऐतिहासिक क्षण होता. मात्र, या दौऱ्याच्या वेळी राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक तसेच मुंबई पोलिस आयुक्त यांनी त्यांची सदिच्छा भेट घेण्याचीही तसदी घेतली नाही. हा प्रकार केवळ शासकीय प्रोटोकॉलचे उल्लंघन नव्हे, तर घटनात्मक पदाचा आणि जातीय समतेचे प्रतीक असलेल्या व्यक्तीचा केलेला मोठा अवमान असल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे.

संबंधित वरिष्ठ अधिकारी हे केवळ पदासाठी जगतात, पण पदाच्या मूल्यांशी पूर्णतः दुरावलेले आहेत. त्यांच्यात ना एकात्मिक चेतना आहे, ना न्याय आणि संवेदनशीलतेची जाण. संघटनेने ही कृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झालेल्या राजकीय अपमानाशी साधर्म्य सांगितली आहे. बाबासाहेबांना स्वतंत्र भारतात पहिल्या लोकसभेच्या निवडणुकीत जातीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर पराभव पत्करावा लागला होता, हीच मानसिकता आजही अधिकाऱ्यांमध्ये दिसते, असा घणाघात संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

या अधिकाऱ्यांना पगारहमी दगडभेजा अधिकारी म्हणून संबोधून, संघटनेने त्यांच्या मनोवृत्तीवर कठोर टीका केली आहे. पगारहमी म्हणजे केवळ सरकारी पगारासाठी काम करणारे, तर दगडभेजा म्हणजे संवेदनाशून्य, विवेकशून्य प्रशासनिक मानसिकता. त्यांच्याकडून केवळ प्रशासकीय दक्षतेचीच नाही, तर संवैधानिक सन्मानाचीही अपेक्षा असते. पण या कृतीने ते त्या कसोटीवर पूर्णतः अपयशी ठरले असल्याचे अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी म्हटले आहे.

या अधिकाऱ्यांनी त्वरित सार्वजनिक माफी मागावी, अशी मागणी संघटनेने केली असून, अन्यथा त्यांना पगारहमी दगडभेजा अधिकारी म्हणून समाजासमोर जाहीर करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. ही केवळ निषेधाची भूमिका नसून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या चेतनेतील परिवर्तनाची एक हाक आहे. सरकारी पगार घेताना जर सर्वोच्च घटनात्मक पदाच्या व्यक्तीचाही सन्मान राखता येत नसेल, तर त्या अधिकाऱ्यांचे नैतिक पतन अटळ आहे. सन्मान आणि जनतेचा विश्वास आता हमीने मिळणार नाही, तर तो कमवावा लागेल, असे देखील संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'मंगलदिप'च्या कर्जदारास ४५ हजार रूपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने कर्जदार प्राजक्ता किरण राणा, रा. सिव्हील हडको, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ४५ हजार रुपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस सश्रम कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. प्राजक्ता किरण राणा यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने प्राजक्ता किरण राणा यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार प्राजक्ता किरण राणा यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अ‍ॅड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अ‍ॅड. अमित अडागळे व अ‍ॅड. विलास ढोणे, अ‍ॅड. गौरव हरबा, अ‍ॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.



**ना.छगनराव भुजबळ यांच्या कॅबिनेट मंत्रिपदी निवडीचे माळीवाडा येथे जल्लोषात स्वागत**

समता परिषदेचे संस्थापक आणि ओबीसी नेते नामदार छगनराव भुजबळ यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर, माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ समता परिषद व सकल ओबीसी समाज समन्वय समितीच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी पेढे वाटून व फटाके फोडून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. या प्रसंगी समता परिषदेचे पश्चिम विभागीय अध्यक्ष अंबादास गारुडकर, सरचिटणीस अनिल निकम, जि. प. सदस्य शरद झोडगे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, प्रा. संजय गारुडकर, जालिंदर बोरुडे, सदाशिव घाडगे, कैलास हराळे, रामदास फुले, राहुल हजारे, जाधव, मंगल भुजबळ, राजू पडोळे, अमोल घाडगे, बजरंग भुतारे, जाधव, विजय बेलेकर, अंबादास पुंड, भास्कर चौधरी, अर्जुन बोरुडे, भाऊसाहेब पुंड यांच्यासह समता परिषदेचे कार्यकर्ते आणि ओबीसी समाजबांधव उपस्थित होते.

# कर्जदारास १८ महिन्यांची कैद व १,४४,००० रूपये दंडाची

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने कर्जदार छाया आसाराम सातपुते, रा. लेखानगर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून १८ महिने कैद व १,४४,००० रुपयांचा चेक अनादर झाल्या तारखेपासून द.सा.द.शे. ९ टक्के व्याजासह दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास ६ महिने साधी कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे.

छाया आसाराम सातपुते यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांच्याकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने छाया आसाराम सातपुते यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार छाया आसाराम सातपुते यांना शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अ‍ॅड. सुहास एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अ‍ॅड. अमित अडागळे व अ‍ॅड. विलास ढोणे, अ‍ॅड. गौरव हरबा, अ‍ॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# सहजयोग ध्यान साधनेमुळे आत्मिक शांतता लाभते

## सचिन जगताप यांचे प्रतिपादन; माताजी श्री निर्मला देवी यांचा मेघा पब्लिक प्रोग्राम



माताजी श्री निर्मला देवी यांच्या परम कृपेत जॉगिंग ट्रॅक मैदान सावेडी येथील सहजयोग ध्यान साधनेची माहिती व कुंडीलिनी शक्ती जागृतीचा कार्यक्रम नुकताच झाला.

नगर – आजच्या ताण तणावाच्या दुनियेत ध्यान साधनेची प्रत्येकाला फार गरज आहे. सहजयोग ध्यान साधना ही आंतरराष्ट्रीय स्तरावर असून ही ध्यान साधना नियमित केल्यामुळे आंतरिक शांती मिळते याचा अनुभव मी घेतलेला असून प्रत्येकाने सहजयोग ध्यान साधना अंगीकारावी, असे आवाहन सचिन जगताप यांनी केले. माताजी श्री निर्मला देवी यांच्या परम कृपेत जॉगिंग ट्रॅक मैदान सावेडी येथील सहजयोग ध्यान साधनेची माहिती व कुंडीलिनी शक्ती जागृतीच्या कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य सहजयोग प्रचार प्रसार टीमचे प्रचारक प्रा. नितीन पवार, सचिन जगताप, बाबासाहेब वाकळे, सचिन जाधव, अजिंक्य बोरकर, डॉ. सागर बोरुडे, अमोल यावलकर, मेजर कुंडलिक ढाकणे, रावसाहेब भोपळे, कोकरे, ताजणे, उमा चव्हाण, अमित बुरा व श्रीनिवास बोज्ञा आदी उपस्थित होते.

अमरावती येथील संगीतकार संदीप दलाल व मिलिंद दलाल यांनी संगीताने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. श्रीनिवास बोज्ञा यांनी स्वागत केले. प्रास्ताविक अशोक तरकसे यांनी केले. कार्यक्रमाची माहिती देतांना प्रा. नितीन पवार म्हणाले सहजयोग ध्यान साधनेचा फायदा लहान मुलापासून तरुण व वयोवृद्धा पर्यंत सर्वांना होतो. हा योग कुटुंबातील सर्वानी एकत्रित बसून करता येणारा योग आहे, या ध्यान साधनेमुळे प्रत्येक मानवाला सुखी व आनंदी जीवन जगता येते. भारतासह जगातील १४० देशापेक्षा जास्त देशातील नागरिकांनी सहजयोग ध्यान साधना प्राप्त केली असून त्या ठिकाणी आजपावेतो विनासायास ध्यानसाधना चालू आहे. कार्यक्रमाची सुरुवात रॅलीने करण्यात आली. यामध्ये २ लाईटिंग केलेले रथ, ४ घोडे, दोन उंट, मोठे बँड पथक, हलगीवाले, ट्रॅक्टर ट्रॉली व यामध्ये वेशभूषा केलेले श्री गणेशजी, हनुमान जी, श्री सिताराम, श्री शिव पार्वती, लक्ष्मण, महालक्ष्मी महासरस्वती, महाकाली, भारत माता घोड्यावरती स्वार झालेले श्री छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर व माँ जिजाऊ असे पात्र पोशाखात उभे होते. याचे विशेष आकर्षण म्हणजे अहिल्यानगर येथील सहजयोगी महिलांनी अनेक दिवस परिश्रम करून जो लेझीमचा डाव बसवला तो अप्रतिम होता. या लेझीम डाव साठी शुभम भालदंड यांनी परिश्रम घेतले. रॅली मध्ये मशाल धरणारे जेष्ठ सहजयोगी, श्रीमाताजींची प्रतीमा ठेवलेले रथ तसेच माताजींच्या चरणाची पालखी असे मोठ्या प्रमाणात सहजयोगी संपूर्ण महाराष्ट्रातून उपस्थित होते. कार्यक्रमाचे ठिकाणी एल ई डी स्टेजवर होता तर साधकांसाठी दोन्ही बाजूला दोन एल ई डी लावण्यात आले होते. स्टेजवर सिंहासनावर माताजींची मोठी प्रतिमा होती. संपूर्ण मैदानात प्रचंड प्रकाश होता. अशा या संपूर्ण मेगा पब्लिक प्रोग्रामचे आयोजन मोहोळ, सोलापूर येथील अमोल यावलकर, नाशिक येथील सुमित अहिरे, लोणी येथील अमोल अभंग, संगमनेर येथील मनोज वाकचौरे यांच्यासह अहिल्यानगर येथील वसंत गायकवाड, उत्तम बेरड, चंद्रकांत रोहोकले, विनायक जोग, पंतम काका, संदीप गांगर्डे, शुभम, नितीन देवळालकर, गजेंद्र सांगळे, मनोज बोज्ञा, मनोहर म्याना, अविनाश आडेप, लक्ष्मण अंदे, गणेश कोडम, अशोक कराळे, राजू मंचे, राजू द्यावनपेल्ली, रवींद्र आगरकर, मनोज चव्हाण, बालाजी मेरगू, विशाल संभार, कार्तिक ढाकणे, अथर्व बोज्ञा, धनंजय ढाकणे, अमर बुरा तसेच स्त्री शक्ती म्हणून जयश्री सामलेटी, वीणा बोज्ञा, किरण येनगंदुल, सुनीता शिदे, सुलभा सोलट, वासंती वैद्य सह अनेक महिलांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन सुमित अहिरे यांनी केले तर अमित बुरा यांनी आभार मानले.

## १२ वी च्या परिक्षेत ९२.३३% गुण मिळवून तनुश्री तलरेजा उत्तीर्ण



नगर – जय बजरंग कॉलेजची विद्यार्थीनी तनुश्री तलरेजा हिने सीबीएसई १२ वी च्या परिक्षेत ९२.३३% गुण मिळवून उत्तीर्ण झाली. तिला गणित या विषयाच्या शिक्षक वृषाली गांधी व देसरडा–भंडारी व तिच्या आईचे मार्गदर्शन लाभले. तनुश्री ही कापडाचे व्यापारी दीपक तलरेजा यांची कन्या आहे. तिला लष्करी कायदा या विषयात प्रविण्य मिळवायचे आहे.

# गुणवंत विद्यार्थी सारडा महाविद्यालयाचे लौकिक वाढवतील : संजय जोशी

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – सारडा महाविद्यालयाची घवघवीत यशाची परंपरा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे. त्यामुळे त्यांचे कौतुक करताना आनंद होत आहे. महाविद्यालय अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रत चौफेर प्रगती करत आहे. हे गुणवंत विद्यार्थी भविष्यात उच्च पदस्थ होतील व महाविद्यालयाचे लैकिक वाढवतील, असा विश्वास हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




१२ बोर्ड परिक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील उच्च श्रेणीने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, संजय जोशी, डॉ.रमेश झरकर, डॉ.पारस कोठारी, अजित बोरा, सुमतिलाल कोठारी, जगदीश झालानी, प्रा.ज्योती कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, गिरीश पाखरे, अशोक असेरी, सुजीत कुमावत, बी.यू.कुलकर्णी, योगेश देशमुख आदींसह प्राध्यापक.

१२ बोर्ड परिक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील उच्च श्रेणीने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, सुमतिलाल कोठारी, जगदीश झालानी, प्रा.ज्योती कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित आदींच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, पर्यावेक्षक सुजीत कुमावत, बी.यू.कुलकर्णी, योगेश देशमुख आदींसह प्राध्यापक, सत्कारार्थी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे व विद्यार्थ्यांच्या परिश्रमाने यावर्षीही उत्तम व उत्कृष्ट निकाल लागला आहे. यात मुलींनी बाजी मारली आहे. आर्ट्‌र्स विभागात पैकीच्या पैकी गुण विद्यार्थ्यांनी पटकावले आहेत. हे सोपे नाही. भविष्यात हे विद्यार्थी नक्की कलेक्टर किंवा मोठ्या पदावर दिसतील.

डॉ.रमेश झरकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी मिळवलेल हे यश सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे आहे, या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिल्यावर आपले ध्येय साध्या करण्यासाठी ते नव्या उमेदीने धावत जातील. यासाठीच या कौतुक सोहळ्याचे आयोजन केले आहे.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालयातर्फे होणारा हा सत्कार घरचा आहे. असे अनेक सत्कार तुमचे पुढील आयुष्यात होणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी गुरु व पालक खंबीरपणे उभे असतात तो विद्यार्थी उतुंग भरारी घेत असतो. याच भावनेन सारडा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आपले कर्तव्य बजावत आहेत.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी महाविद्यालयाचा तिन्ही विभागाचा सविस्तर निकाल सांगून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रा.मानसी केळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजू रिक्कल यांनी आभार मानले. प्रा.अतुल कुलकर्णी यांनी सहाय्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

